सत्यमेव जयते
महाराष्ट्र वन विभाग

वाघ, बिबट बाबतची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दतींची (SOP) पुस्तिका

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA)



संकलन
उत्तम शं. सावंत, भावसे
उपसंचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कराड

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, कोल्हापूर

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर अंतर्गत सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानची स्थापना महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक WLP 10-11/CR-260/F-1, दिनाक ०८ नोव्हेंबर, २०११ अन्वये झाली. तसेच दिनांक ०४.०५.२०१२ अन्वये धर्मादाय उप आयुक्त कोल्हापूर यांचेकडे सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था म्हणून नोंदणी पुस्तकातील क्रमांक ई-२६४३/कोल्हापूर नुसार नोंदणीकृत आहे. प्रतिष्ठान स्थापनेचा उद्देश व्याघ्र प्रकल्प आणि लगतच्या प्रदेशातील पर्यावरणीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीक विकास करणे. व्याघ्र प्रकल्प आणि लगतचे प्रदेशातील संबंधित ठिकाणी नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करणे. कायद्याच्या अधिन राहून विविध स्त्रोतांकडून उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांसाठी आवश्यक तांत्रिक, आर्थिक, सामाजिक आणि इतर पाठिंबा मिळवणे. इको डेव्हलपमेंट, इकोटूरिझम, संशोधन, पर्यावरण शिक्षण, प्रशिक्षण व्यवस्थापन आणि उपरोक्त संबंधित विषयातील अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना पाठिंबा देणे. प्रतिष्ठानास मिळणारी देणगी व अनुदान हे वरील उद्देशांची पुर्तता करण्याकरिता वापरले जाते.

❖ **पेंच-बोर व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानच्या प्रकाशित पुस्तिकेत योगदान दिलेल्या खालील सर्व अधिकारी व छायाचित्रकारांचे आभार !**

- **भाषांतर सहकार्य :** श्री. उत्तम सावंत, सवसं, बोर व्याघ्र प्रकल्प, श्री. एन. व्ही. काळे, सवसं, पेंच व्याघ्र प्रकल्प, श्रीमती रूपाली भिंगारे, वपअ, न्यु बोर अभयारण्य, श्री. आर. एम. उमाथे.
- **विशेष सहकार्य :** श्री. एम. एस. रेड्डी, भावसे, क्षेत्र संचालक तथा मुख्य वनसंरक्षक पेंच तथा बोर व्याघ्र प्रकल्प, नागपूर, डॉ. एस. एच. पाटील, भावसे, अ.प्र.मु.व.सं. श्री. डी. एच. राऊत, उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, श्री. एस. बी. भलावी, विवअ (वन्यजीव) बोर अभयारण्य, श्री. ए. डब्लु. निमजे, सवसं, श्रीमती दिपाली तलमले (वनकर) सवसं, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
- **छायाचित्र सहकार्य :** संजय करकरे, विशाल बनसोड, रोहित कारू, अंकुर काली, दिनेश खाते, कमलेश ठाकुर, डॉ. हिमांशु जोशी, हर्ष पिरॅमल, डॉ. मैत्रिश्वा व्यास, डॉ. रमझान विराणी, डॉ. चित्रा राऊत, डॉ. एस. आर. देसमुख, चित्रा डॉ. व्ही. जुंगले, विष्णू गायकवाड, श्री. रविकिरण गोवेकर आणि श्री. वैभव माथुर, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरन, नवी दिल्ली.

❖ **प्रकाशक :** सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान, कोल्हापूर दुसरा मजला, वनवर्धन ईमारत, मुख्य पोस्ट ऑफिस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर, ४१६००३,
फोन. नं. : ०२३१ - २५४२७६६,
email : ccfwlkolhapur@mahaforest.gov.in

❖ **प्रकाशन वर्ष :** एप्रिल २०२२, कराड, सातारा

अनुक्रमणिका

अ. नं.	तपशिल	पान क्रमांक
1	प्रस्तावना	-
2	मानवी वास्तव्य असणाऱ्या भूभागात वाघाच्या भरकटण्यामुळे उद्भवलेली आणीबाणीची परिस्थिती हाताळणेबाबतची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती जानेवारी, २०१३ (Standard Operating Procedure to deal with Emergency Arising due to Straying of Tigers in Human Dominated Landscapes)	01-32
3	वाघ, बिबट यांचे मृत शरीर/अवयव नष्ट करावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती मार्च, २०१३ (Standard Operating Procedure (SOP) for Disposing Tiger/ Leopard Carcass/ Body parts)	33-40
4	वाघाचा मृत्यु झाल्यास वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती जानेवारी, २०१३ (Standard Operating Procedure for Dealing with Tiger Death)	41-64
5	वाघ व बिबट : आपणास हे माहित हवं ! (Tiger & Leopard... You should know about)	65-88



प्रस्तावना

वाघ आपला राष्ट्रीय प्राणी आहे. जगातील १३ देशात वाघ आढळतो, तर भारतातील 18 राज्यातील जंगलात त्याचा वावर आहे. जगात शिल्लक असलेल्या वाघांपैकी ७० टक्के वन्यस्थितीतील वाघ आपल्या देशात आहेत. २० व्या शतकाच्या सुरुवातीस भारतात ४०,००० पेक्षा जास्त वाघ होते. इंग्रजांच्या काळात वाघाची शिकार ही एक छंद, खेळ आणि सामाजिक दर्जा म्हणून मान्यताप्राप्त होती. परंतू स्वातंत्र्यानंतर वाघांची संख्या कमी होत गेली, तशी शिकारीवर बंदी आली. १९७२ च्या सुमारास वन्यस्थितीत फक्त १२०० पर्यंतच वाघ शिल्लक राहिल्याचे लक्षात आले. साऱ्या जगाच्या आकर्षणाचा बिंदू असणाऱ्या भारतीय वाघास वाचविण्यासाठी १९७३ ला केंद्र सरकारने प्रोजेक्ट टायगर योजना सुरु केली. त्यावेळी ०९ व्याघ्र प्रकल्प स्थापन करण्यात आले. महाराष्ट्रातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प, त्यापैकी एक. वाघांची स्त्रोत संख्या (Source Population) वाचविणे व वाढविणे हा त्यामागचा प्रमुख उद्देश होता. आपला राष्ट्रीय प्राणी व नैसर्गिक वारसा वाचविण्यासाठी आपली बांधीलकी ठेवत आज ०९ वरुन ५२ व्याघ्र प्रकल्प स्थापन झाले असून त्यापैकी महाराष्ट्रात ०६ व्याघ्र प्रकल्प आहेत. वाघांची संख्या सन २००६ मध्ये १४११, २०१४ मध्ये २२२६ आणि २०१८ मध्ये २९६७ इतकी झाली आहे. तरीसुध्दा आज वाघाच्या कातडी व अवयवांची तस्करी व वाघांच्या अधिवासाचा व भ्रमणमार्गाचा ऱ्हास ही व्याघ्र संवर्धनातील सर्वात मोठी आव्हाने आहेत.

आज वाघाचा वावर असलेल्या क्षेत्रात मानव - वन्यप्राणी संघर्षाच्या घटना वाढत चाललेल्या आहेत. त्यास प्रथम बळी पडतात ते वाघ आणि बिबट! अशा परिस्थितीत मोक्याच्या ठिकाणी प्रथम पोहोचणारा वनविभागाचा प्रतिनिधी हा क्षेत्रीय कर्मचारी, वनमजूर, वनरक्षक किंवा वनपाल असतो. त्यामुळे अशा आपत्कालीन स्थितीत कोणाची काय जबाबदारी आणि कोणी काय करायचे याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. त्याकरिता राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) नवी दिल्ली यांनी मानव-वन्यजीव संघर्षात आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या कार्यपध्दतीत एकसुत्रता राहावी व अशी परिस्थिती यशस्वीपणे हाताळता यावी याकरिता विविध प्रचलित कार्यपध्दती (Standard Operating Procedures) तयार केलेल्या आहेत. परंतु या कार्यपद्धती (SOP) इंग्रजीमध्ये असल्यामुळे त्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. म्हणूनच ही पुस्तिका मराठीत भांषातर करुन श्री. उत्तम सावंत, भा.व.से. पेंच-बोर व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान, नागपूर यांनी यापूर्वी प्रकाशित केलेल्या व संकलीत केलेल्या पुस्तिकेवरुन पुर्नसंकलीत करुन सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान मार्फत प्रकाशित करण्यात येत आहे.

मला खात्री आहे की, ही पुस्तिका क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांना, वन अधिकाऱ्यांना, पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांना वाघ - बिबटमुळे उद्भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीत नक्कीच मार्गदर्शन करणारी ठरेल आणि आपले क्षेत्रीय अधिकारी - कर्मचारी असे प्रसंग आत्मविश्वासाने व यशस्वीरित्या हाताळतील आणि आपल्या राष्ट्रीय हरित वारसा संवर्धनात महत्वाची भूमिका पार पाडतील.

ही पुस्तिका प्रत्यक्षात आणण्यासाठी श्री. उत्तम सावंत, भा.व.से. व श्री. शिशुपाल पवार, व.प.अ. म.व.से. यांनी योगदान दिले, त्याबद्दल त्यांचे आभार. मुळ पुस्तिका प्रत्यक्षात आणण्यात योगदान असलेल्या पेंच - बोर व्याघ्र प्रकल्पाच्या सर्व वन अधिकारी व कर्मचारी आणि सर्व छायाचित्रकारांचे ही खूपखूप आभार !

Nadkat

(नानासाहेब लडकत)

कार्यकारी संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान,
कोल्हापूर तथा क्षेत्र संचालक सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर

भाग – 1

मानवी वास्तव्य असणाऱ्या भूभागात वाघाच्या भरकटण्यामुळे उद्‌भवलेली आणीबाणीची परिस्थिती हाताळणेबाबतची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती

(Standard Operating Procedure to Deal with Emergency Arising due to Straying of Tigers in Human Dominated Landscapes)



जानेवारी, 2013

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली
पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार

मानवी वास्तव्य असणाऱ्या भूभागात वाघाच्या भरकटण्यामुळे उद्‌भवलेली आणीबाणीची परिस्थिती हाताळणेबाबतची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती

1. शीर्षक (Title) :– मानवी वास्तव्य असणाऱ्या भूभागात वाघाच्या भरकटण्यामुळे उद्‌भवलेली आणीबाणीची परिस्थिती हाताळणेबाबतची प्रमाणभूत कार्यपध्दती.
2. विषय (Subject) :– मानवी वास्तव्य असणाऱ्या भूभागात वाघाचे भरकटण्यामुळे उद्‌भवलेली आणीबाणीची परिस्थिती हाताळणे.
3. संदर्भ (Reference) :– राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण / व्याघ्र प्रकल्प यांचा या विषयीचा सल्ला.
4. प्रयोजन (Purpose) :– माणसाचा मृत्यु वा माणसांस जखमी करणे, तसेच वाघ, पाळीव प्राणी वा संपत्ती याची हानी न होता मानवी वस्तीत भरकटलेल्या वाघास सुव्यवस्थीतपणे हाताळणे.
5. लघु सारांश (Short Summary) :– मानवी वस्तीत वाघाच्या भरकटण्यामूळे उद्‌भवणाऱ्या घटनांना हाताळतांना क्षेत्रिय स्तरावर (व्याघ्र प्रकल्प व त्याबाहेर) घ्यावयाच्या किमान मूलभूत खबरदाऱ्यांची ही प्रमाणभूत कार्यपध्दती माहिती देते.
6. व्याप्ती (Scope) :– ही प्रमाणभूत कार्यपध्दती व्याघ्र प्रकल्पासह संबंधीत वनक्षेत्र तसेच अशा घटना घडणाऱ्या सर्व क्षेत्रामध्ये लागू राहील.
7. जबाबदाऱ्या (Responsibilities) :– व्याघ्र प्रकल्प व लगतच्या क्षेत्रासाठी क्षेत्रसंचालक जबाबदार राहतील. संरक्षित क्षेत्राकरीता (राष्ट्रीय उद्यान/वन्यजीव अभयारण्य) संबंधीत संरक्षित क्षेत्राचे नियंत्रण अधिकारी जबाबदार राहतील. इतर क्षेत्रासाठी (महसुल जमीन/संवर्धन राखीव क्षेत्र/लोकसंवर्धन राखीव क्षेत्र/गाव/शहरी भाग) यामध्ये वन्यजीव



(संरक्षण) अधिनियम–1972 नुसार वन्यजीव रक्षक किंवा संबंधीत क्षेत्राचे नियंत्रक, विभागीय वन अधिकारी किंवा उपवनसंरक्षक जबाबदार राहतील. राज्य स्तरावर संपूर्ण जबाबदारी संबंधीत राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक यांची राहील.

8. भरकटलेली मांसभक्षी वन्यप्राण्याबद्दल (वाघ / बिबट) सुचवलेली क्षेत्रीय कार्यपध्दती.

क) सुरुवातीस तांत्रीक मार्गदर्शनासाठी व दररोजच्या संनियंत्रणाकरीता (monitoring) खालीलप्रमाणे एका समितीची स्थापना करावी.

- **I.** मुख्य वन्यजीव रक्षक यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी
- **ii.** राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी
- **iii.** एक पशुवैद्यक
- **iv.** स्थानिक अशासकिय संस्थेचा प्रतिनिधी
- **v.** स्थानिक स्वराज्य संस्थेचा एक प्रतिनिधी
- **vi.** क्षेत्र संचालक / संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापक / विभागीय वनअधिकारी / उपवनसंरक्षक – अध्यक्ष

ख) भारतीय वन्यजीव संस्था देहरादूनचे तज्ञ मदतीला नेहमीच मिळणे शक्य नसल्याने, बाहेरील तज्ञ व्यक्तीला संनियंत्रणाकरीता (monitoring) बोलविण्यात यावे.

ग) कॅमेरा ट्रॅप फोटोंचे राष्ट्रीय भांडार (National Repository of Camera Trap Photographs of Tigers) किंवा प्रकल्प स्तरावरील फोटोंशी तुलना करुन वाघाची ओळख पटवून घ्यावी व त्याच्या स्त्रोत क्षेत्राची (Source Area) माहिती करुन घ्यावी.

घ) काही दिवसांच्यापूर्वी त्याभागातील वाघाने पाळीव प्राण्यांची शिकार, मानवास जखमी करणे, तसेच प्राणघातक हल्ला केलेल्या घटनांची माहिती प्राप्त करुन घ्यावी. जर या क्षेत्राला अशा

घटनांचा पूर्व इतिहास असेल तर वाघासंबंधीत वारंवार उद्‌भवणाऱ्या आणीबाणीच्या प्रसंगाची कारणमीमांसा करणेसाठी विस्तृत शास्त्रीय अभ्यास करणे आवश्यक आहे.

च) पाळीव प्राण्याची शिकार / मानवास ईजा / मानवी मृत्यु किंवा मानवी वस्तीत वाघाच्या वारंवार भरकटण्याच्या घटनांची पूष्टी झाल्यास, प्राण्याला पकडण्यासाठी त्या जागेवर जास्त गोंधळ न करता योग्य आमिषासह (Lure)स्वयंचलित पिंजरा (Atomatic closure trap) लावावा.



छ) संबंधीत प्राण्याची ओळख पटविण्याकरीता / खात्री करण्याकरीता शिकारीच्या ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावावा.

ज) शिकार झालेल्या पशूचे कलेवर (kill) वाघाने विना अडथळा खाण्याकरीता (मानवी वस्तीपासुन फार जवळ नसल्यास) कलेवरास संरक्षण द्यावे व त्यावर बदला घेण्यासाठी विषप्रयोग होणार नाही, याची खात्री करावी.



ज) संबंधीत प्राण्याच्या रोजच्या हालचालींची माहिती करुन घेण्याकरीता क्षेत्रामध्ये 'प्रेशर इंम्प्रेशन पॅड' (PIP) तयार करावे व त्याची माहिती (4 इंच = 1 मैल किंवा 1:50,000 प्रमाणावर) नकाशावर दाखवावी.

झ) स्थानिक नागरिकांची होणारी गर्दी टाळण्यासोबतच, त्या क्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था ठेवण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी/जिल्हा न्यायदंडाधीकारी/वरीष्ठ पोलीस अधिक्षक/पोलीस अधिक्षक यांची विशेषत्वाने सक्रीय मदत घ्यावी. त्यांना मानव – वन्यजीव संघर्ष व त्याविषयीच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सुचनांबाबत अवगत करावे.

ट) मानवी वस्त्यांमध्ये वाघ/बिबटच्या भरकटण्याच्या प्रत्येक घटनांमध्ये जिल्हा प्रशासने दंड प्रक्रिया संहिता (CrPC) च्या कलम 144 च्या वापरासह कायदा व सुव्यवस्था टिकेल याची काळजी घ्यावी. अन्यथा प्राणी ज्या जागेवर आहे तेथील लोकांचे आंदोलन/क्षोभामुळे प्राण्याला पकडण्याची क्रिया बाधीत होते व कर्मचारी तसेच नागरिकांना ईजा होऊ शकते. पोलीस व स्थानिक प्रशासनाला अगदी सुरुवातीपासूनच निर्णय प्रक्रियेत सामावून घेणे गरजेचे आहे. जमावाच्या नियंत्रणासाठी परिणामकारक समन्वय आवश्यक आहे. समन्वयाअभावी अनेक प्रसंगी, यामुळे टाळता येऊ शकणाऱ्या दुर्घटना व प्रसंग ओढवलेले आहेत.

ठ) वाघाच्या क्षेत्रीय अस्तीत्वासंबंधी गावागावांत पूर्वसूचना देण्याकरीता जिल्हास्तरीय अधिका–यांची मदत घ्या.

ड) जर पिंजराबध्द करण्याच्या प्रयत्नांना वारंवार अपयश येत असेल तर, पशुवैद्यकाचा अंतर्भाव असलेल्या तज्ञ चमुकडून रासायनिक अचलीकरणाचा (बधिरीकरण) वापर करावा. यामध्ये जोडपत्र–1 च्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

ढ) जर अचलीकरण (बधिरीकरण) केलेला वाघ सुदृढ व तरुण असेल व कुठल्याही दृष्टीने अकार्यक्षम (सुळे दात तुटणे/जखमी/तुटलेला पंजा इत्यादी) नसेल तर परिच्छेद 1 मध्ये



गठीत समितीने निश्चित / प्रमाणित केल्यानुसार राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला सूचीत करुन, पुरेसे खाद्य असलेल्या व मानवी वास्तव्यापासून दूर असलेल्या, तसेच इतर नर वाघाचे क्षेत्र नसलेल्या सुयोग्य अधिवासात रेडीओ कॉलरींग करूनच मुक्त करावे. (कुठल्याही परिस्थितीत जखमी किंवा अकार्यक्षम वाघास परत मुक्त करु नये आणि त्यास मान्यताप्राप्त संग्रहालयात ठेवावे.)



त) कुठल्याही परिस्थितीत मनुष्य हानीच्या सवय नसलेल्या वाघास वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 चा उपयोग करुन मारण्यात येवू नये. नरभक्षी प्राण्यांबद्दलच्या मार्गदर्शक सूचना पूर्तता/मार्गदर्शनासाठी जोडपत्र–2 मध्ये दिलेल्या आहेत.

थ) सुदृढ वाघ किंवा पिल्ले असलेली वाघीण हे उसाचे शेत किंवा त्यासारख्याच अधिवासात असेल, तर त्यास आधी, विना



अडथळा जवळच्या जंगलाकडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न करावा. जर अशा कार्यात अपयश आले तर प्राण्यास रासायनिक अचलीकरणाव्दारे (बधिरीकरण) पकडण्यात येवून रेडिओ कॉलरींग करून जवळच्या व्याघ्र प्रकल्प किंवा संरक्षीत क्षेत्रातील वाघाची कमी घनता असलेल्या प्रदेशात सोडावे.

द) आवश्यक वाटल्यास घटनेची किंवा त्या संबंधीत चुकीची माहिती पसरण्यापासून रोखण्याकरीता वनविभागाचा अधिकृत प्रवक्ता नेमण्यात यावा व त्याने प्रसार माध्यमांना वेळोवेळी माहिती द्यावी, अन्यथा सनसनाटीमुळे किंवा विकृत माहितीमुळे अधिक नुकसान होऊ शकते.

ध) कॅमेरा ट्रॅपव्दारे वाघांची गणना (टप्पा–IV) सुरु असल्यास राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडून तपासून घेतल्याशिवाय प्रदेशातील वाघांच्या वैयक्तीक मिळालेल्या फोटोवरून काढलेल्या न्युनतम वाघांच्या संख्येस, अवास्तव प्रसिध्दी देवू नये.

न) वाघा वन्यस्थितीत (wild) मुक्त करणे किंवा प्राणीसंग्रहालयात देणेबाबतचा अंतीम निर्णय मुख्य वन्यजीव रक्षक यांनी घ्यावा.

प) पकडलेल्या मांसाहारी प्राण्यास कमीत कमी ताण (Stress) पडेल अशा प्रकारे योग्यरित्या पिंजऱ्याची रचना आणि वाहतुकीची सुविधा करणे आवश्यक आहे.

9. प्रतिबंधात्मक / स्वयंप्रेरित उपाय (Preventive /Proactive measures) : भरकटलेल्या वाघाच्या घटना / अशी शक्यता असलेल्या क्षेत्रात जोडपत्र – 3 मध्ये दिल्याप्रमाणे अवलंब करावा.

10. वाघाचे संनियंत्रणासाठी प्राधान्य क्षेत्रासाठी मार्गदर्शक सूचना जोडपत्र–4 मध्ये दिल्या आहेत.

जोडपत्र – अ

वाघास जेरबंद करण्यास आणि अचलकरणेबाबतची नियमावली

(Protocol on Immobilization and Restraint of Tigers)

सामान्य विचार (General Consideration) :–

★ **वागणूक** (Behavior) :- जंगलात मुक्त संचार करित असलेल्या वन्यस्थितीतील वाघाच्या आणि मनुष्य वस्तीत चुकून आलेल्या किंवा मनु य आणि प्राणी यांच्या संघर्षात अडकलेल्या वाघाच्या वर्तनात खूप जास्त फरक असतो. अशा संघर्षात सापडलेला वाघ बुजरा किंवा दडपणाखाली आणि मनुष्याला चुकविण्याचा चोरटा प्रयत्न करू शकतो. अशा वेळेस त्याच्या वर्तनाबाबत काहीही वर्तवू शकत नाही आणि अशा परिस्थितीत त्याला जेरबंद करणे जिकिरीचे होऊ शकते. शिवाय त्याला जेरबंद करणाऱ्या आणि जवळ असलेल्या इतर मनुष्याला त्याच्यापासून हानी पोहोचू शकते. त्यामुळे अशा परिस्थितीत सापडलेल्या वाघाला जेरबंद करताना उपस्थित माणसांच्या सुरक्षेचा सर्व तऱ्हेने विचार करणे अत्यावश्यक आहे.

★ **जेरबंद करण्याचे उपलब्ध विकल्प** (Capture Options):-वाघास जेरबंद करण्यास उपलब्ध असलेल्या पर्यायामध्ये प्रत्यक्षरित्या किंवा भूल देऊन किंवा त्याच्या प्राकृतिक स्थितीत जेरबंद करता येऊ शकते किंवा गरज पडल्यास दोहोंचाही उपयोग होऊ शकतो. वाघास जेरबंद करताना अनेक गोष्टींचा विचार करून योग्य पर्यायाची निवड करावी लागते. जसे की, जनावरांचे शरीर क्रियात्मक आणि भावनिक / मानसिक स्थिती, जेरबंद करण्यास लागणारा वेळ, हवामान, त्या भागाची भौगोलिक रचना, जागेवर उपलब्ध असलेले आवश्यक साहित्य, औषधांची उपलब्धता हयाशिवाय सर्वाधिक आवश्यक म्हणजे जेरबंद करणाऱ्या चमूतील व्यक्तिची सुरक्षा या गोष्टींना पर्याय निवडतांना प्राधान्य द्यावे. उपलब्ध दोन्ही पर्यायांचे फायदे आणि मर्यादा



आहेत. परंतु हया मार्गदर्शक सुचनामध्ये प्रामुख्याने भूल देऊन जेरबंद (Chemical Restraint) करण्याच्या पर्यायाबाबतच्या माहितीस जास्त प्राधान्य दिलेले आहे.


★ **भूल देऊन जेरबंद करणे** (Chemical Restraint) :– मागील काही दशकांपासुन भूल देऊन जनावरांस अचल करण्याची प्रकिया वन्यजीव व्यवस्थापनामध्ये फार महत्त्वाची ठरली आहे. हया विभागात सतत होणाऱ्या प्रगतीमुळे भूल देऊन जेरबंद करण्यासाठी नविन आणि सुरक्षित औषधे आणि औषधे देण्याची कार्यक्षम व विश्वसनीय पध्दती नव्याने आल्या आहेत. भूल देऊन जेरबंद करण्यामध्ये (Chemical Immobilization) औषधांचा वापर करून प्राण्याची हालचाल मर्यादित केली जाते. जेणे करून त्या प्राण्यामध्ये अचेतन स्थिती निर्माण होईल व जाणीवपूर्वक हालचाल रोखली जाईल. हे तंत्र मानव – वन्यप्राणी संघर्षात सापडलेल्या वाघास जेरबंद करण्यासाठी योग्य पर्याय आहे. कारण हे तंत्र हवा असलेला प्राणी पकडण्यास मदत करते, प्राणी पकडण्याची वेळ निश्चित करणे शक्य होते आणि प्राण्यावर किमान ताण पडतो. भूल देण्यासाठी वापरलेली औषधे ही निश्चितच मध्यवर्ती मज्जा संस्थेच्या कार्यात महत्त्वाच्या कार्याशी तडजोड न करता बदल घडवतात आणि प्राण्यांमध्ये भूलीची स्थिती निर्माण करून प्राण्यास तोपर्यत अचल ठेवतात, जोपर्यंत माणुस आणि प्राणी दोघेही सुरक्षित असतील.

★ **अचलीकरणासाठी वापरण्यात येणारी साधने** (Immobilization Equipments) :– वन्यप्राण्याजवळ जाताना आणि त्यांना हाताळताना, खूप अडचणी येतात, त्यामुळे त्यांना भूलीची औषध देण्याची सुरक्षित आणि प्रभावी पध्दत असणे गरजेचे आहे. (जेणेकरून डार्ट ही साधनाद्वारे सर्वात प्रभावी आणि सुरक्षित पर्याय ठरला पाहिजे.) डार्ट हि साधनांद्वारे सोडली जाते आणि ज्या प्राण्यास लागते त्यांच्या

मांसल भागात (Intra muscularly) औशधे मुक्त करते. डार्ट ही विविध आकारात उपलब्ध आहेत, परंतु डार्ट मारण्यास वापरण्यात येणाऱ्या साधनांच्या प्रकारानुसार त्या विशि ठ (Specific) असतात.



डार्ट साधानातून (Projector) पुढे ढकलण्याच्या विविध पध्दती (Power







Projection System) आहेत. परंतु वाघासाठी अशी पध्दत निवडावी, ज्यामध्ये प्रचंड दबावाखाली (compressed) भरलेला वायु / कार्बन डाय



ऑक्साईडचा डार्ट ढकलण्यासाठी वापर केलेला असावा. हवेच्या दाबाने / कार्बन डॉय ऑक्साईडचे प्रचलन तंत्र असलेले (Airpowered / CO_2) टेली इंजेक्शन प्रोजेक्टर (गन) मध्ये 3 – 5 मि.ली. क्षमतेचे कमी वजनाचे प्लास्टीक डार्ट वापरून दुरून डार्ट मारावी. वाघास डार्टिंग करताना सुईची लांबी हा महत्त्वाचा घटक आहे. डार्टच्या सुईचा बाहेरून व्यास 1.5 – 2.0 मि.मी. तर लांबी 38 – 40 मि.मी. असावी.

★ **भूल / अचल करणारे औषधी द्रव्ये (Immobilization Drugs)** :– हयापुर्वी वाघांना पकडण्यासाठी विविध औषधी द्रव्यांचा उपयोग झालेला आहे, परंतु त्यातल्या त्यात संयुक्तरित्या वापरण्यात आलेले अल्फा – 2 ॲड्रीनेरजीक ॲगोनिस्ट (शामक) आणि अलिप्तपणा आणणारी औषधे (Dissociatives) वाघांना अचल करण्यात प्रभावी सिध्द झाली आहेत.

★ **अल्फा – 2 ॲड्रीनेरजीक ॲगोनिस्ट / शामक (Alpha - 2 Adrenergic Agonists / Sedatives)** :– हे औषधीद्रव्य मद्यवर्ती मज्जा संस्थेच्या कार्यामध्ये मंदपणा आणतात. हया औषधीद्रव्यामध्ये चांगले शामक, मांसल भागात शिथिलता आणि पिडा कमी करणारे गुण आहेत. परंतु ही औषधीद्रव्ये अत्यंत सावधगीरीने वापरणे गरजेचे आहे. कारण हयात सुरूवातीस रक्तदाब वाढणे (Hypertension) आणि लगोलग रक्तदाब कमी होणे (Hypotension)], छातीचे ठोके कमी होणे (bradycardia), रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण वाढते (Hyperglycemia)] मूत्रामध्ये ग्लुकोज वाढते (Glucosuria), शारिरिक तापमानात फेरबदल

(disrupts thermoregulation) असे बदल दिसून येतात व त्याचबरोबर लगेच मांसाहारी प्राण्यांस उलटी होणे (regurgitation) दिसून येते. परंतु हया औषधी द्रव्यांचा फायदा हा आहे कि हया स्वस्तातील, अनियंत्रित आणि हयाचे उलट परिणाम करणारे औषधी द्रव्ये (reversible) उपलब्ध आहेत. हया औषधी द्रव्यांचा मार्जार कुळामध्ये (felids) मध्ये अलिप्तपणा आणणाऱ्या औषधी (dissociatives) सोबत संयुक्तरित्या प्रभावीपणे वापर करण्यात आलेला आहे. झायलेझीन आणि किटेमीनचे 1. 25 : 1 प्रमाणात संयुक्तपणे मिश्रण (mixture), ज्यास **'हेलाब्रुन मिक्चर'** म्हणतात, ते वाघांसाठी / इतर मांसभक्षी प्राण्यात अतिशय प्रभावीपणे वापरलेले आहे.

दुसरे अल्फा – 2 ॲगोनीस्ट औषधे :– मेडेटोमिडीन आणि किटेमीनच्या संयुक्त मिश्रणाचा वापर सुध्दा अत्यंत प्रभावी आणि विशिष्ठ शामक म्हणून मोठया मांसाहारी प्राण्यामध्ये उपयोग सिध्द झाला आहे. कारण ते प्राण्यामध्ये गतीने अभिक्रम (Induction) अवस्था आणते आणि त्याचा उतारा असणारे (Antidote) औ ाधही उपलब्ध आहे. ही अल्फा–2 ॲट्रेनेरजिक ॲगोनिस्ट हे ॲन्टीडोटने कमी करणे (negated) शक्य आहे.

उदा :– झायलेझीन, डेटोमिडीन, मेडेटोमिडीन,

उतारा आणणारी औषधी द्रव्ये (Antidotes) :– योहीमबाईन हायड्रोक्लोराईड, ॲंटीपॅमॅझोल

हायड्रोक्लोराईड, टोलॅझोलीन हायड्रोक्लोराईड.



अलिप्तपणा आणणारे औषधीद्रव्ये (Dissociatives) :–

यामध्ये सायकोटोमिमेटीक औषधी द्रव्ये आहेत ज्यामध्ये सायक्लोहेक्झामिन डेरिव्हेटीव्हस् आहेत. हे औषधी द्रव्य असा परिणाम करते कि, शुध्दीत असलेल्या मेंदु (conscious mind) मध्ये शरीराचे संवेदनात्मक (sensory) आणि गती संस्थेमध्ये (motor or control mechanism) (अलिप्तपणा) तात्काळ पिडाशामक (Analgesia) आणि गुंगी (Trancelike) आणते, जे की मद्यवर्ती मज्जा संस्थेच्या अती उत्तेजनामुळे असे होते. हया स्थितीत प्राण्यास बाजुला असलेल्या मानवाचे भान राहत नाही. हे औषधीद्रव्ये मांसल भागात किंवा थेट रक्तवाहीन्यामधून दिल्यामुळे जलदगतीने परिणाम करतात, शिवाय सुरक्षितही आहेत आणि हयात श्वसन प्रक्रिया आणि रक्ताभिसरण प्रक्रिया कमी प्रमाणात मंदावतात. याचे मांसपेशीत ठळक ताठरपणा (muscle rigidity), उच्च शारीरिक तापमान (hyperthermia) , लाळ गळणे (hypersalivation), आचके येणे (convulsion) आणि हया अचल अवस्थेतून बाहेर येताना होणारा त्रास (rough recovery) हे काही अनुषांगीक बाहय परिणाम दिसुन येतात. सदर औषधी द्रव्यांचा अनुषांगीक बाहय परिणाम (side effect) बरेच प्रमाणात कमी करण्यासाठी हि औषधे शमन (tranquilizer) किंवा शामक (Sedatives) बरोबर संयुक्तरित्या वापरावीत. हया औषधी द्रव्याचा होणारा परिणाम उलटता येऊ शकत नाही आणि प्राण्याची हया अवस्थेतुन संपुर्णपणे बाहेर येईपर्यंत त्यांच्येवर संनियंत्रण (monitoring) ठेवावे लागते. हया औषधी द्रव्यासाठी उतारा आणणारे औषधीद्रव्ये (Antidote) नाहीत.

उदा. :– फेनसायक्लीडीन, किटॅमीन हायड्रोक्लोराईड, टिलेटामाईन हायड्रोक्लोराईड

जनावरांस अचल करण्यास सगळयात जास्त पसंती हेलाब्रुन मिक्चर, (एच.बी.एम) (झायलेझीन – किटेमीन संयुक्त पणे 1.25:1 या प्रमाणात) देण्यात येते. जनावरास देण्यात येणारे औषधी द्रव्याचे प्रमाण

/ मात्रा हे प्रत्यक्ष मोक्यावर, त्या विशिष्ट प्राण्याचे शारीरीक स्वास्थ व अवस्था, उत्तेजीत अवस्था, शारीरीक क्रियात्मक स्थिती, लिंग, दिवसातील वेळ, भोवतालचे साधारण तापमान शिवाय अधिवासाचे इतर घटक ध्यानात घेऊन ठरविण्यात येते. मानव आणि वन्यप्राण्याच्या संघर्षाच्या घटनेत वाघास जेरबंद करण्यासाठी मेडेटोमीडीन आणि किटॅमीनचा संयुक्तपणे उपयोग अत्यंत प्रभावी ठरला आहे. कारण, हयाचे परिणाम फार जलदगतीने आणि कमी वेळेत होतात, जेणेकरून डार्ट मारल्यावर प्राणी फार दूरपर्यंत हालचाल करू शकत नाही.

प्रौढ वाघ अचल करणेसाठी शिफारस करण्यात आलेल्या औषधांचे प्रमाण :

अ. क्र.	अचल करणेसाठी वापरण्यात येणारी औषधी द्रव्ये	नर	मादी	अचलअवस्थेतून बाहेर आणणारी औषधीद्रव्ये
1.	Hellabrunn Mixture (HBM) (Xylazine (XYL) and Ketamine (KET) mixture in a ratio of 1.25:1	**3.0 ml** (375mg XYL & 300 mg KET) **to 3.5 ml** (437.5 mg XYL & 350 mg KET)	**2.5 ml** (312.5mg XYL & 250 mg KET) **to 3.0 ml** (375 mg XYL & 300 mg KET)	Yohimbine Hydrochloride (0.125 mgkg^{-1} body weight)
2.	Medetomidine(MED) and Ketamine (KET)	50-60µg kg^{-1}body weight MED and 1-2 mgkg^{-1} body weight KET		25-35 mg of Atipamezole Hydrochloride



Preferred darting site in a large carnivore

* **लक्ष केलेल्या जनावरांच्या जवळ जाणे (Approch to the Target Animal)** :– लक्ष केलेल्या प्राण्याजवळ (Target Animal) जाताना, चारचाकी वाहन किंवा बंदीस्त अवस्थेतील प्रशिक्षित हत्तीचा वापर करता येऊ शकतो, तसेच त्यावेळी सर्वांची सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि उच्च संयम बाळगावा. ज्या भूभागावर गाडयांचा वापर करता येऊ शकत नाही, अशा ठिकाणी मचाणावरून डार्ट करण्याची शक्यता तपासावी. संघर्षात सापडलेल्या वाघाला जेरबंद करण्याच्या प्रक्रियेत डार्टींग करताना पुरेशा संधी मिळत नसल्यामुळे प्राण्याच्या शारिरीक वैशिष्ठयांबाबत ज्ञान आणि डार्टींगचा अनुभव असलेली व्यक्ती आवश्यक आहे. सहसा दुरून डार्टींग करताना प्राण्याचा मागील पृष्ठभाग (Hind Quarter) सगळयात सोईचा असतो. परंतु प्रत्यक्ष कशी संधी मिळते, त्यावर अवलंबून आहे. पण इतर कोणत्या भागावर डार्टींग करू शकतो, तेही तपासावे.
* **अभिक्रम अवस्था (Induction phase):-** डार्टींग केल्याच्या क्षणांपासून सदर प्राणी, ज्याक्षणी पूर्णपणे अचल होऊन जातो, या दोन क्षणांमध्ये जो वेळ लागतो, त्याला अभिक्रम अवस्था म्हणतात. अभिक्रम अवस्थेत जाण्यासाठीचा एकूण वेळ 10–15 मिनीटांचा असू शकतो. हया संपूर्ण वेळेत चमूने प्राण्याच्या हालचालीचे अगदी सूक्ष्मपणे निरिक्षण ठेवावे, शिवाय हयापूर्ण वेळेत जनावराच्या सभोवती शांतता राहील, याची काळजी घ्यावी.
* **अचल अवस्थेत असलेल्या प्राण्यास हाताळणे व काळजी घेणे (Handling & Care of the Immobilized Animal)** :– अचल अवस्थेतील प्राण्याजवळ जाताना अतिशय सावधगिरी आणि शांतता बाळगावी व खालील प्रमाणे कार्यवाही करावी.
- सुई (Dart) काढावी.

- प्राण्याचे डोळे कपडयाने झाकून द्यावे, जेणेकरून त्यांच्या डोळयाच्या पुरपटलाचे (cornea) सूर्यकिरण, धूळ आणि इतर ईजापासून संरक्षण होईल.
- अचल झाल्यावर जनावराला योग्यरित्या छाती आणि पोटाच्या भारावर किंवा एका कडेवर ठेवावे. जेणेकरून त्याचे श्वासोच्छवास आणि रक्ताभिसरण सुरळीत राहील.
- जनावराच्या अवस्थेचे मुल्यांकन करावे, मांसपेशींची ताठरता, श्वासोच्छवासाची स्थिती (खोली आणि वेग) यांचे निरीक्षण करावे. प्राण्याच्या बधिरावस्थेचे खालील पदध्तीने मूल्यांकन करावे.
- **मांसपेशीमध्ये औषधे मिसळणेवर (परफ्युजन) वर संनियंत्रण ठेवणे :**बधिर करणारी औषधे हृदयाच्या आंकुचन शक्तीवर परिणाम करते आणि (व्हॅसोडायलेशन) रक्तवाहीन्या प्रसरण पावल्यामुळे औषधीद्रव्ये मांसपेशीत हळुहळू किंवा कमी प्रमाणात पसरते. या स्थितीचे मुल्यांकन करण्यास्तव प्राण्याचे निरिक्षण करणे, हृदयाचे ठोके तपासणे (auscultation), प्राण्याचे स्पर्शपरिक्षण (Palpation) आणि रक्त पुरवठा (Capillary refilltime) या गोष्टीचे निरिक्षण करावे.



- **श्वासोच्छवासाचे मुल्यांकन करणे** : बधिरावस्थेत प्राण्याचे श्वासोच्छवासाचा वेग फार बदलत असतो.
- श्वासोच्छवासाचा दर्जा (Quality) प्राण्याच्या छातीच्या हालचालीचे मूल्यांकन करून ठरवावा.



- मध्यवर्ती मज्जा संस्थेचे कार्य किती मंदावले आहे, याचे मूल्यांकन हे प्राण्याच्या जबडयाचा ताठरपणा (Jawtone), मांसपेशीचा ताठरपणा (Muscle Tone) आणि डोळयांच्या हालचालीचा प्रतिसाद (Eye Reflexes) यावरून ठरवावे.
- प्राण्याच्या प्राणभूत हालचाली जसे कि, श्वासोच्छवासाची गती, हृदयाचे ठोके आणि शारीरिक तापमान यांचे संनियंत्रण (monitoring) ठेवावे.
- प्राण्याच्या शरीरावर कोणत्याही प्रकारची ईजा असल्यास नोंद घ्यावी (त्यामध्ये सुळे आणि नखांच्या अवस्थेचीही नोंद घ्यावी.)
- प्राण्याच्या शरीराचे वजन घ्यावे, शिवाय शक्य असल्यास शरीराचे मोजमाप घ्यावे.

प्राण्याला रूग्णपटावर हलविणे (Shifting of the Animal to Stretcher) :—

प्राण्याला रूग्णपटावर हलवावे आणि त्यास छाती आणि पोटाच्या भारावर किंवा एका कडेवर (Lateral or Sternal Recumbancy) ठेवावे. त्यानंतर त्या प्राण्यास परिवहन पिंजऱ्यात (Transport cage) हलवावे.



बधिरीकरण अवस्थेतून बाहेर आणणे (Reversal of Anesthesia) :— बधिर अवस्थेतून बाहेर आणण्यास विशिष्ठ अल्फा–2 एन्टोगोनिस्ट (योहिमबाईन एच.सी.एल., ॲटीपॅमेझोल एच.सी.एल या औषधांचा वापर करावा.

सहायक माहिती (Supplemental Information) :—

अ) पुर्वतयारी (Preparedness) :– प्राण्यास डार्ट करण्यापूर्वी रेडिओ कॉलर व इतर उपसाधने, संकटकालीन लागणारी औषधे, जैविक नमूने गोळा करण्यास लागणारे साहित्य, परिवहन पिंजरा (Transport Cage) आणि इतर आवश्यक साहित्य इत्यादी सोबत असल्याची खात्री करून घ्यावी.

ब) आकडेवारी नमुद करणे (Data Recording) :– संपुर्ण अचल अवस्थेच्या नोंदी यामध्ये विशेषतः दिलेल्या प्रत्येक औषधाचे नाव, त्यांचे प्रमाण, देण्यात आलेली वेळ, शरीर क्रियात्मक सर्व गोष्टींच्या नोंदी घेण्यात याव्यात. या सर्व नोंदींचा तपशील दिलेल्या नमुन्यात नमुद करावा. तसेच या संपुर्ण प्रक्रियेदरम्यान कोणताही वाईट प्रसंग उद्‌भवू नये म्हणुन माणसांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात यावी.

क) बधिर अवस्थेचे मूल्यांकन करणे (Assessing Depth of Anaesthesia) :– औषधी द्रव्याच्या उद्‌गमन अवस्थेला (drug Induction to happen) जवळजवळ 15 मिनिटे लागू शकतात. प्राण्याजवळ जाण्यापूर्वी तो पूर्णपणे बधिर / अचल झाला आहे किंवा कसे याचा आधी अंदाज घ्यावा. त्याकरिता एका लांब काठीने त्यांच्या शेपटीवर किंवा कानावर हळूच थापटी द्यावी. जर प्राण्याने काहीच हालचाल केली नाही, तरच त्याच्या जवळ जावे. बधिरावस्था योग्य असल्यास, प्राण्याचा जबडा उघडून आतील जिव्हा बाहेर सुलभतेने काढता येईल. इतर निदर्शकात त्याच्या शरीराच्या इतर भागास, पायास, पुरःपटल (cornea), कान, जिभेच्या उत्तेजनास मिळालेल्या प्रतिसादाचा समावेश आहे. शरीर रचनात्मक अनुषांगिक हालचालीचेही मूल्यांकन करावे. जसे की, शारीरीक तापमान, श्वासोच्छवास, नाडी आणि म्युकस मेम्ब्रेनचा रंग हयाशिवाय घसा, जबडा आणि दाताच्या अवस्थेचेही मूल्यांकन करावे. आणीबाणी / संकटकालीन स्थितीत (Depressed respiration or cardiac arrhythmias or depression श्वासोच्छवास किंवा हृदयाचे ठोके कमी झाल्यास) प्राण्यास पुन्हा बधिरावस्थेतून बाहेर



काढावे. संकटकालीन औषधे त्यामध्ये हृदयाचे कार्य आणि श्वासोच्छवास (Cardiac and respiratory stimulants) (उत्तेजित करणारी औषधे) सदैव हाताशी ठेवावीत.

ड) आणीबाणीचे प्रसंग हाताळतांना (Managing Emergencies) :– काही आणिबाणीचे प्रसंग उद्‌भवल्यास अशा वेळी लागणारी औषधे आणि साधने संपुर्ण प्रक्रियेत उपलब्ध असावीत. तसेच संकटकालीन उपयोगी औषधे ही सदैव पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहतील याची खात्री करावी.



इ) चमुची रचना (Composition of Team) :– मोठया मार्जार जातीला पकडणे हे एक आव्हान असते म्हणूनच, तो कौशल्यपूर्ण चमू असणे गरजेचे आहे. हया चमुमध्ये वन्यजीव व्यवस्थापक, जीवशास्त्रज्ञ, प्रशिक्षीत पशुवैद्यकिय अधिकारी आणि प्राण्यास भूल देण्यात निपुण असलेले अधिकारी सर्वात प्राधान्याने असावेत.

जोडपत्र – 1 अ
अचल प्राण्याचे संनियंत्रण आणि नोंदी घेण्यासाठीची आकडेवारी पत्रक
(Data Sheet for recording and monitoring immobilized animal)

क्षेत्राचा तपशील (Area details)

दिनांक : .....ठिकाण : .....

जिपीएस : रेखांश : ..... अक्षांश :.....

कॉलरची फ्रिक्वेंसी : .....

जेरबंद करण्याचे कारण :.....

साधारण तापमान :.....

दिनमान (ढगाळ, स्वच्छ): .....

प्राण्याचा तपशील (Animal Details) :–

प्रजात ..... शारिरीक अवस्था .....

औ ाध देण्यापूर्वीची मानसिक स्थिती :.....

लिंग :..... अंदाजे वय :.....

वजन (कि.ग्र)..... प्रजनन क्षमता / दर्जा :–

शरीराचे मोजमाप (Body Measurements) :–

नाकाच्या टोकापासून शेपटाच्या टोकापर्यंत .....

नाकाच्या टोकापासून ते शेपटीच्या सुरूवातीपर्यंत .....

नाकाच्या टोकापासून कवटीच्या बुडापर्यंत .....

शेपटीची लांबी ..... उंची (खांदयाचे टोक ते टाच).....

मागील पायाची लांबी.....पुढील डावे पाय किंवा मागचे पायाच्या पंजाचे मोजमाप ..... लांबी .....रुंदी, मानेची गोलाई .....सुळे दातांची लांबी.....

बधिरीकरणाचे नोंदी : (Immobilization Details)

अ. क्र.	बधीर करण्यास वापरलेली औषधे	देण्याची वेळ	दिलेले प्रमाण	मार्ग	जागा
1.					
2.					
3.					
4.					

डार्ट करतानांची प्राण्यांची स्थिती (धावत असणे, चालत असणे, उभे, उत्तेजीत स्थितीत) .....

अभिक्रम अवस्था (Induction Time) (जनावर अचल झाले / त्याचे जवळ गेले) .....



प्राण्याचे संनियंत्रण (Animal Monitoring) :–

वेळ	अचल झालेले दिसल्यानंतरचे नोंदी	श्वासोच्छवास वरवर / खोल / अनियमित / गती	शारिरीक तापमान (^{0}F)	ठोक्याचे दर

बधिरावस्थेतून बाहेर काढणे (Drug Reversal) :

अ. क्र.	औषधीद्रव्याचे नाव	औषध दिल्याची वेळ	औषधांचे प्रमाण व मात्रा	मार्ग	जागा

बधिरावस्थेतून बाहेर येताना प्राण्यांची दिसलेली प्रथम हालचालीचे लक्षणे :–.....

बधिरावस्थेतून पूर्ण शुद्धीवर येईपर्यंतचा प्राण्याचा टिपलेला संपुर्ण तपशील :–.....

शेरा :– .....

पुरक औषधीद्रव्ये (Supplemental drugs) :–

अ. क्र.	वापरलेली इतर सहायकारी औषधांची नांवे	विक्रीचे नाव	वापरलेली मात्रा	मार्ग	जागा

जैवीक नमुने (Biological Sampling)

नमुन्याचे नाव	वापरलेले परिक्षण	अपेक्षीत तपासणी	कुणास दिले	शेरा

जोडपत्र–02

वाघ/बिबट यांना नरभक्षक घोषित करण्यासंबंधीची मार्गद र्शक तत्त्वे

(Guidelines for declaration of big cats as man eater)

- वाघ व बिबट दोन्ही सवयीने मानवांचे जीव घेऊ शकतात, (नरभक्षक) हे ज्ञात आहे. अशा निश्चित ठरलेल्या नरभक्षकांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या कलम 11 मधील कायदेशीर तरतुदींचा उपयोग करुन संपविले पाहिजे.
- वाघ तसेच बिबट वन्यजीव संरक्षण अधिनियम–1972 च्या अनुसूची–1 मध्ये येत असल्यामुळे त्यांना कलम 9(1) नुसार सर्वाधिक कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. म्हणून या प्रजाती जर मानवी जीवास धोका करू लागल्या किंवा तंदुरुस्त न होण्यापलीकडे आजारी किंवा क्षतीग्रस्त झाल्यास, त्यांना ठार मारले जावू शकते.
- मानवी जीवीतास धोका निर्माण करणारे किंवा तंदुरुस्त न होण्याइतपत आजारी किंवा क्षतीग्रस्त असलेल्या वन्यप्राण्यांचे बाबतीत वन्यजीव (संरक्षण) अधिनियम,1972 च्या कलम 11(1)(a) नुसार फक्त राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक यांना शिकारीची परवानगी देण्याचे अधिकार आहेत. परंतु कायदेशीर परिपूर्तीसाठी राज्याच्या मुख्य वन्यजीव रक्षकास शिकारीपूर्वी लेखी स्वरुपात प्राण्यास संपविण्याची कारणे द्यावयाची आहेत.
- वाघ व बिबटसारखे मोठया मांजरीच्या जातीतील प्राणी नरभक्षक होण्याकरीता बरीचशी कारणे आहेत. जसे म्हातारपणामुळे येणारी शारीरीक अक्षमता, गंभीर जखमांमुळे किंवा सुळया दातांचे निखळणे किंवा तुटणे इत्यादीमुळे परंतु, यामध्ये बरेचसे अपवाद असू शकतात, त्यामुळे प्रत्येक प्रकरणांमध्ये कारणमीमांसा देणे आवश्यक आहे.
- वाघाचे अस्तित्व असलेली वने व जवळपासचे पशुहानीग्रस्त क्षेत्र याशिवाय या क्षेत्रावर अधिकार व सवलती असणाऱ्या मानवी वस्त्या





हया नरभक्षक प्रवणक्षेत्र असतात. शिवाय जवळच्या वाघाच्या स्त्रोत क्षेत्रांना (Source Area) जोडणाऱ्या अधिवासाचा होत चालल्याच्या ऱ्हासामुळे मानवी वस्तीजवळ वाघ भरटकतो व नरभक्षक म्हणून शेवट होतो.

वाघ, बिबटमुळे होणाऱ्या मनुष्यहानीबाबत सुचविलेल्या उपाययोजना
(suggested steps on loss of human life due to tiger/leopard)

1. तांत्रिक मार्गदर्शन आणि पूर्ण प्रक्रियेबाबत नियंत्रण ठेवण्यासाठी एक चमू खालीलप्रमाणे गठीत करावा.
- राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक यांनी नामनिर्देशित केलेला एक प्रतिनिधी
- राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणने नामनिर्देशित केलेला एक प्रतिनिधी
- पशुवैद्यकिय अधिकारी
- स्थानिक अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी
- स्थानिक पंचायतीचा प्रतिनिधी.
- क्षेत्रसंचालक / संरक्षित क्षेत्र व्यवस्थापक / विभागीय वनअधिकारी / उपवनसंरक्षक (नियंत्रक) – अध्यक्ष

2. शिकारीच्या ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावावेत. हयाशिवाय प्राण्याच्या रोजच्या रोज हालचालीवर लक्ष ठेवण्याकरिता पी.आय.पी (प्रेशर

इम्प्रेशन पॅड)बनवावीत.

3. ज्या ठिकाणी हल्ल्यात मानवी मृत्यु झाला आहे, अशा क्षेत्रात स्थानिक लोकांना जाण्यापासून सावध/मज्जाव करणेकरिता जिल्हास्तारीय अधिकाऱ्यांना (जिल्हाधिकारी/ जिल्हान्यायदंडाधिकारी/ पोलिस अधिक्षक) घटनेची माहिती दयावी, त्याशिवाय अशा भागात शांतता राखण्याकरिता स्थानिक लोकांनी गर्दी करू नये म्हणून विशेष काळजी घ्यावी.
4. यासाठी गठीत केलेल्या चमुद्वारे आधी मनुष्य हानी करणाऱ्या जनावरांची ओळख पटवावी. हयासाठी कॅमेरा ट्रॅप किंवा प्रत्यक्षदर्शी व्यक्ती किंवा घटनास्थळी आणि जवळपास आढळणारे पंजा ठशांची मदत घ्यावी. शिवाय आढळल्यास केसांचे आणि विष्ठेचे नमुनेही डी.एन.ए. (DNA) साठी गोळा करावे.
5. मुद्दाम सवयीने माणसाची शिकार केलेली (Habituated man eater) आणि माणसाची अचानक गाठ पडल्याने हल्ला झाल्यामुळे (Chance encounter) मारल्याची घटना यामध्ये फरक ओळखला पाहीजे. जास्तीत जास्त आपले जंगल संरक्षीत क्षेत्राच्या बाहेर आहे व इथे लोकांची ये – जा असल्यामुळे अचानक गाठ पडल्याने झालेल्या हल्ल्याचे (Chance encounter) प्रमाण (Probability) जास्त असते, तसेच वाघ हे पाळीव गुरे किंवा निलगाईच्या शिकारीसाठी बऱ्याचदा शेती/उसाची क्षेत्रे आणि अशा प्रकारचे नदी काठच्या क्षेत्रांचा वापर करताना माणसावर जीवघेणे हल्ले होवू शकतात. अशा प्राण्यास 'नरभक्षक' म्हणून घो ीत करू नये. परंतु माणसाची दबा धरून किंवा लपतछपत पाठलाग करत शिकार करून मानवदेह भक्षण करण्याची सवय झालेल्या (Habituated) वाघ/बिबटयास 'नरभक्षक/ मानवभक्षी' घोषीत करता येते.
6. अशा विक्षिप्त वागणाऱ्या वाघांस/ बिबटयास 'मानवभक्षी/नरभक्षी' घोषीत करण्यापूर्वी क्षेत्रीय पुराव्यांचा



आधारावर सखोल परिक्षण करण्यात यावे. काहीवेळा अचानक गाठ पडल्याने (chance of encounter) मानवाची शिकार केली जाते व खाल्ली जाते (बहुतेकदा कमी सावज (Prey) घनता असलेल्या क्षेत्रास पिल्ले असलेल्या वाघीणीकडून). तरीपण, अशा घटना वाघ/बिबट यास मानवभक्षी/नरभक्षी घोषीत करण्यास पुरेशा नाहीत, तर सदर विक्षीप्त प्राणी त्यांचे नैसर्गिक सावज (Prey) टाळून मुद्दाम दबा धरून माणसाला मारण्याची सवय लागल्याची पुरेपुर खात्री झाल्यानंतरच त्यास तसे घोषीत करता येऊ शकते.

7. कोणत्याही परिस्थितीत जरी मानवी वस्तीजवळ येऊन पाळीव प्राण्यांची शिकार करण्याचे धाडस करणाऱ्या वाघ/बिबटयांस मानवभक्षी घोषीत करू नये. अशा परिस्थितीमध्ये कोणत्याही वाईट घटना घडू नये म्हणून अशा प्राण्यास पिंजऱ्यात पकडण्याचे प्रयत्न (भुल देऊन जेरबंद किंवा पिंजऱ्याचा वापर करावा) करून प्रश्न सोडवावा.
8. वारंवार मांसाहारीप्राणी येणाऱ्या क्षेत्रात स्वयंमचलीत पिंजरे (आतमध्ये सावज (lure)ठेवून)लावावेत.
9. जेव्हा पुन्हा पुन्हा पिंजऱ्यात पकडण्याचे प्रयत्न करूनही योजना अपयशी झाल्यास सोबत जोडलेल्या दिशानिर्देशाचे (Protocol)चे पालन करून संबंधीत प्राण्यास रासायनिक अचलिकरणाद्वारे पकडण्यासाठी तज्ञ चमूचे गठन करावे.



10. अशा विक्षिप्त प्राण्यास पकडण्याच्या पर्यायामध्ये पिंजरा लावून किंवा रासायनिक

अचलीकरण पध्दतीने पकडण्याच्या पर्यायाचा अवलंब करावा. पकडल्यानंतर तो वन्यप्राणी जवळच्या मान्यताप्राप्त प्राणी संग्रहालयात ठेवावा, त्यास वन्यक्षेत्रात सोडण्यात येऊ नये.

11. प्रमाणभूत कार्यपद्धतीमध्ये दिल्याप्रमाणे प्राण्यास जिवंत पकडण्याचे सर्व पर्याय संपल्यानंतरच शेवटचा पर्याय म्हणून नरभक्षक घोषीत केलेल्या वाघ / बिबटयास मारण्याचा पर्याय निवडावा.
12. राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक यांनी वाघ / बिबटयास 'नरभक्षक' म्हणुन घोषित करण्यापूर्वी उचित मूल्यांकन करून लेखी स्वरूपात कारणे द्यावीत.
13. नरभक्षक घोषित केल्यानंतर त्यास योग्य आकाऱ्याच्या बंदुकीने (0.375 मॅग्नम पेक्षा कमी नसलेली) या कार्यात निपुण असलेल्या विभागातील अधिकाऱ्यामार्फत मारण्यात यावे. तर असा तज्ञ विभागांतर्गत उपलब्ध नसेल तर योग्य परवानगी घेऊन शासनाच्या इतर विभागातून किंवा बाहेरून मिळवता येईल.
14. मानवभक्षी प्राण्यास मारून नष्ट करणाऱ्यास कोणत्याही प्रकारचे बक्षिस घोषित करण्यात येऊ नये.

जोडपत्र–03

वाघ भटकून मानवी अधिवासात आल्याची घटना घडल्यास अवलंबवयाच्या पध्दतीविषयी तपशीलवार सूचनाः प्रतिबंधात्मक / स्वयंप्रेरित उपाय

(Preventive/Proactive Measures)

क) घटनांची स्थळे / राज्यातील जिल्हे ओळखणे.

ख) वाघ वारंवार मानवीवस्तीत येत असेल तर अशा घटनामागची कारणे शोधून काढण्यासाठी शास्त्रीय अभ्यास करावा व त्यांचे विश्लेषण करावे.

ग) वने, त्यातील वाघांचे अधिवास, मानवाची वस्ती आणि वाघांचे



नियमित हालचाली करण्याचे मार्ग (Corridor), हे दर्शविणारे गुगल मॅप बनवावे.

घ) शीघ्रकृती चमू (Rapid Response Team - RRT) शिवाय स्थानिकांचा समावेश असलेली व 24 X 7 चालू बिनतारी संदेशवहन असलेल्या संनियंत्रण (monitoring) चमूची स्थापना करावी.

च) पूर्वसुचना देणाऱ्या यंत्रणेचा उपयोग करावा.

छ) घटना घडल्यास जवळच्या गावातील लोकांना सावध राहण्याचा इशारा देण्यात यावा.

ज) पाळीव जनावराची शिकार (Cattle Kill) झाली असल्यास, त्या शिकारीवर नजर ठेवण्यात यावी तसेच, मालकास तात्काळ भरपाई द्यावी.

झ) रात्रीच्या वेळी वाघाच्या हालचालीवर नजर ठेवण्यास इलेक्ट्रॉनिक्स साधनांचा वापर करावा.

ट) पाणस्थळे, शिकार (Cattle Kill) आणि विद्युतवाहन तारा (Transmission lines) नियमितपणे तपासाव्यात.

ठ) पुढे काही अनुचीत घटना टाळण्यास्तव प्राणी पकडण्यासाठी शीघ्रकृती चमु (Rapid Response Team - RRT) कार्यरत ठेवावा. सदर शीघ्रकृती (Rapid Response Team - RRT) चमुकडे पुढे नमुद साधने आणि व्यक्ती असाव्यात.

१. असे आधुनिक वाहन ज्यात पिंजरा व अनुषंगीक साधने आणि चमूतील व्यक्ती बसण्याची सोय असते.

२. प्राण्यास अचल करण्यासाठी लागणारी सर्व योग्य साधने आणि पुरेशी औषधीद्रव्ये असावीत.

३. प्राण्यास तात्काळ अचल करण्यास टेझर गन (Taser gun).

४. वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत सतत संपर्कात राहण्यासाठी दोन भ्रमणध्वनी यंत्र.

५. चार बिनतारी संदेश यंत्र

६. दोन जी.पी.एस. संच.

७. अंधारात काहीही हालचाल बघण्यास जास्त क्षमतेचे नाईट विजन (Night Vision)-

८. एक डिजीटल कॅमेरा.

९. चार ट्रॅप पिंजरे (दोन वाघासाठी / दोन बिबटयांसाठी)

१०. उंच सखल भागात पिंजरा वाहून नेण्यास एक छोटा ट्रॅक्टर.

११. दोन सर्च लाईट

१२. रिसीव्हर आणि ऐंटीनासह दोन रेडीओ कॉलर

१३. दोन तंबु (Portable)

१४. वाहुन नेण्यायोग्य लपण, जे हाताळण्यास सोपे असेल आणि भूल देणाऱ्या चमूच्या उपयोगाचे असेल.

१५. दोन फोल्डींग खुर्च्या आणि टेबल.

१६. हातात धरता येणारे ध्वनीयंत्र

१७. दोरी व जाळी

१८. प्रथमोपचार संच





ढ) शीघ्रकृती (Rapid Response Team - RRT) चमुची गरज हि वाघाच्या हालचालीवर विना दिक्कत आणि जवळून संनियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्याच्या हालचालीचा पाठलाग करण्यासाठी आहे.

न)तसेच, जेथे पाणस्थळ



जागा नाही, अशा ठिकाणी प्राण्याची ओळख पटविण्यासाठी (झाडांवर किंवा खाबांवर) कॅमेरा ट्रॅप लावावा.

द) सदर शीघ्रकृती (Rapid Response Team - RRT) चमूची क्षमता बांधणी (Capacity Building) साठी आणि प्रत्यक्ष क्षेत्रिय प्रशिक्षण (Hands on Field Training) साठी गरज वाटल्यास भारतीय वन्यजीव संस्था (WII) व इतर संबंधीत तज्ञांना बोलवावे.



जोडपत्र–04

वाघांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी द्यावयाची प्राथमिकता.

(Prioritising Areas for Tiger Monitoring)

काही सुरक्षित क्षेत्रे आणि लगतच्या जंगलाशिवाय वाघांची स्त्रोत क्षेत्र (Source Area) व सभोवतीचे जंगल येथे वाघाची संख्या जास्तीत जास्त असते. ज्या विभागात जिल्हा / वनविभागाच्या जंगलामध्ये वाघाचे अस्तित्व नकाशावर दर्शविले आहे, अशा ठिकाणी दररोज सनियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. यासाठी खालीलप्रमाणे कृती सूचित केलेल्या आहेत.

१) फोटो डाटाबेस तयार करण्यासाठी (टप्पा –IV) जेथेजेथे वाघांची स्त्रोत क्षेत्र (Source Area) आहे अशा ठिकाणी कॅमेरा ट्रॅप वापरून संनियंत्रण करावे. जेणेकरून त्या भागातील वाघांची ओळख ठरविण्यात येईल.

२) नकाशात दाखविल्याप्रमाणे वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रात टप्पा – चार (Phase - IV) ची अंमल बजावणी करावी.

३) स्त्रोत क्षेत्राजवळच्या विविध भागात आढळून आलेल्या वाघांच्या छायाचित्रांची वेळोवेळी फेरतपासणी आणि तुलना करून त्यामध्ये वाघांची ओळख (ID) ठरवावी.

४) टप्पा – चार (Phase - IV) संनियत्रणाच्या नामनिर्देशाप्रमाणे (Protocol) दररोजच्या नोंदी करणेबरोबरच कॅमेरा ट्रॅप संनियंत्रणास पुरक असे आजुबाजुच्या क्षेत्रात पायदळ गस्ती करावी.

५) वाघाने केलेल्या पाळीव जनावरांच्या शिकारीवर लक्ष ठेवून नागरिकांना तात्काळ नुकसान भरपाई देणे.

६) वाघाचा वावर असलेल्या भागात त्या जमिनीचा एकदम काही वेगळा वापर सुरू झाल्यास त्याभागात लक्ष ठेवावे.

७) व्याघ्र प्रकल्पाच्या बाहेर वनविभागाकडे येणाऱ्या पारंपरिक वाघ आणि वन्यजीव कॉरीडोर क्षेत्रात कोणतेही अडथळे येऊ देऊ नयेत.

८) वाघाचा वावर असलेल्या क्षेत्रात झाडीचे (Cover value) आवरण मध्ये अचानक होणाऱ्या बदलावर लक्ष ठेवावे. (उदा. पीक पध्दतीमध्ये होणारे बदल इत्यादी)

९) नदीलगत होणाऱ्या वाघांच्या हालचालींवर नजर ठेवणे.

१०) वाघांचा वावर असलेल्या भागांमध्ये किटकनाशकांच्या विक्री व वापर करणाऱ्यांवर लक्ष ठेवावे. (पाण्यातून विषबाधा टाळण्यासाठी)

११) शिकार करण्याच्या हेतूने त्या भागात वावरणाऱ्या पांरपारीक शिकारी टोळींसंबंधीत गुप्त माहिती गोळा करण्यासाठी स्थानिकांच्या माध्यमातून जाळे तयार करावे.

१२) स्थानिक आठवडी बाजारांवर लक्ष ठेवणे.

१३) व्याघ्र प्रकल्पाच्या बाहेरच्या क्षेत्रात ग्रामसभा पातळीवर वन्यजीव संनियंत्रण नोंदवही तयार करावी / नियमित नोंदी ठेवाव्यात आणि वाघाच्या वावर / हालचालीबाबत माहिती देणा–यास बक्षीस दयावे.



१४) ग्रामसभा पातळीवर वन्यजीव/वाघ गुन्हा नोंदवही तयार करावी/नोंदी भराव्यात आणि गुन्हा शोधण्यात मदत करणाऱ्यास बक्षीस देण्याची पध्दत सुरू करावी.

१५) महामार्ग, विहीर (openwell), रेल्वेचे ट्रॅक, विद्युत लाईन्स, गावतलाव, नैसर्गिक पाणवठे, शेतीस पाणीपुरवठा करणारे कालवे इत्यादींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष संनियंत्रण चमू (Special monitoring Team) तैनात करावा.

१६) वाघांचा वावर असलेल्या क्षेत्रातील विहीरी आणि कालवे (irrigation Canal) झाकण्या बरोबरच जास्त भाराच्या विद्युतवहन खांबांना विद्युतरोधक (Insulating) करावे.

१७) वाघाचे अस्तीत्व असलेल्या क्षेत्रातील बच्चे असलेल्या वाघीणीच्या हालचालीवर विशेष लक्ष ठेवून मोठे झालेले वाघांचे बच्चे कोणत्या क्षेत्रात स्थलांतरण करतात, त्यावर लक्ष (monitoring) ठेवावे.

१८) ठराविक दिवसांनी नियमितपणे पाणवठे/वर्षभर चालणारे पाण्याचे स्त्रोतांची तपासणी करून पाण्यात कोणताही विषप्रयोग झालेला नाही हे तपासावे.

१९) वाघाचे अस्तीत्व असलेल्या क्षेत्रात शिकार टाळण्यासाठी योग्य दबावाबरोबर स्थानिक लोकांना वेळोवेळी सावध करावे.

२०) वाघाचे नैसर्गिक सावज (Prey) असलेल्या प्राण्यांमध्ये रोगांचा प्रसार टाळण्यासाठी वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रातील गावांतील पाळीव गुरांमध्ये होणाऱ्या रोगाच्या प्रसारावर नियमित लक्ष ठेवावे.

२१) विषबाधा/शिकार टाळण्यासाठी वाघाचे अस्तीत्व असलेल्या क्षेत्रातील नैसर्गिक चाटण (Salt-licks) असलेल्या ठिकाणावर नियमित लक्ष ठेवावे.

२२) शिकारीचे 'जीन ट्रॅप व स्नेअर' (Gin trap & snare) बनविणाऱ्या (त्यासाठी प्रसिध्द असलेल्या) स्थानिक लोहारावर नियमित लक्ष

ठेवावे.



w) वन्यजीव गुन्हा संबंधित व्यक्तीचा माहिती संग्रह (Dossier) तयार करा आणि वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रातील क्षेत्रीय चमूंना (Field unit) बरोबर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणास सूचित केल्यानंतर त्या माहितीची देवाणघेवाण करा.

x) मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दर पंधरवडयाने वाघाच्या मृत्यूबाबत आणि न्यायालयात चालू वाघाच्या गुन्हाच्या प्रकरणांच्या प्रगतीबाबत आढावा घ्यावा.



पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या एस.टी.पी.एफ. चे ''डॉग क्वॉड''

y) प्रधान मुख्य वनसंरक्षक / वन–बल प्रमुख यांनी दर महिन्यास वाघाच्या मृत्युबाबत आणि न्यायालयात चालू वाघांच्या गुन्हयाच्या प्रकरणांच्या प्रगतीबाबत आढावा घ्यावा.

z) अवयव (bodypart), पळून जाण्याचे मार्ग (Escape Route) आणि इतर संबंधित गो टी शोधण्याकरीता शिकाऊ कुत्र्यांचा (sniffer dogs) वापर करावा.

(ही कार्यपध्दती राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणने पी. के. सेन, डॉ. उल्हास कारंथ, श्रीमती प्रेरणा सिंग ब्रिंद्रा, डॉ. पी. के. मलिक, डॉ. पराग निगम व क्षेत्रीय अधीकारी यांच्या सल्ल्याने बनविली)



भाग – 2

वाघ, बिबट यांचे मृत शरीर / अवयव नष्ट करावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती

(Standard Operating Procedure (SOP) for Disposing Tiger / Leopard Carcass / Body parts)



मार्च, , 2013

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली
पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार

वाघ, बिबट यांचे मृत शरीर / अवयव नष्ट करावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती

1. शीर्षक (Title) :– वाघ, बिबट यांचे मृत शरीर /अवयवांची विल्हेवाट करणेबाबतची प्रमाणभूत कार्यपद्धती.

2. विषय (Subject) :– वाघ मृत्यु, त्यांच्या शरीराच्या अवयवांची जप्ती.

3. संदर्भ (Reference) :– वन व पर्यावरण मंत्रालय / व्याघ्र प्रकल्प / राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) यांच्या या विषयीच्या सूचना (अपर वनमहानिरिक्षक (वन्यजीव), वने व पर्यावरण मंत्रालय, यांचे कडील सुचना क्र. 1– 60/89–WLI, दि. 04/11/1994)



4. उद्देश (Purpose) :– वाघ, बिबट यांचे मृत शरीर /अवयव हे पारदर्शीपणे नष्ट करुन त्यांचा अवैध व्यापार होणार नाही, हयाची खात्री करणे.



5. संक्षिप्त सारांश (Short Summary) :– क्षेत्रिय स्तरावर (व्याघ्र प्रकल्प किंवा इतरत्र) वाघ, बिबटयांचे मृत शरीर आढळून आल्यास किंवा वाघ, बिबटयांचे



अवयव जप्त केले असल्यास त्यांची विल्हेवाट करणे करिता किमान कोणती कारवाई करावी याबाबत हि प्रमाणभूत कार्यपध्दती सुचविते.

6. व्याप्ती (Scope) :– प्रमाणभूत कार्यपध्दती ही व्याघ्र प्रकल्प क्षेत्राबरोबरच ज्या ठिकाणी घटना घडली आहे अशा सर्व प्रकारच्या क्षेत्राला लागू आहे.

7. जबाबदाऱ्या (Responsibilities) :– व्याघ्र प्रकल्पाच्या बाबतीत क्षेत्र संचालक हे जबाबदार राहतील. संरक्षित क्षेत्राकरीता (राष्ट्रीय उद्यान /वन्यजीव अभयारण्य) संबंधीत संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापक /नियंत्रक अधिकारी जबाबदार राहतील. इतर क्षेत्राबाबतीत (जसे महसुल जमीन /संवर्धन राखीव क्षेत्र /लोकसंवर्धन राखीव क्षेत्र / गाव/ शहरी क्षेत्र) यामध्ये वन्यजीव (संरक्षण) अधिनीयम – 1972 अन्वये संबंधीत वन्यजीव रक्षक किंवा ज्यांचे अधिकार क्षेत्र आहे असे विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक जबाबदार राहतील. राज्यामध्ये संबंधित मुख्य वन्यजीव रक्षक यांची सर्वकष जबाबदारी राहील.

8. वाघ, बिबट यांचे मृत शरीर /जप्ती केलेले अवयव आढळून आले आहेत, तेथे मृत शरीर / अवयव नष्ट करणेविषयीच्या सविस्तर सुचना –

(I) गुन्हा घडल्याचे स्थळ / घटना :– जेथे मृत शरीर किंवा शरीर अवयव आढळुन आले आहेत.

- वाघ मृत्यु / शरीर अवयव जप्तीबाबत कारवाई करताना राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने जारी केलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दतीचा अवलंब करावा.
- सामाजिक संस्थामधील प्रतिनिधीत्व असलेल्या स्वतंत्र शवविच्छेदन चमु बरोबर क्षेत्रसंचालक किंवा वनसंरक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्या

समोरच मृत शरीराचे दहन करुन ते नष्ट करावे.

- मृत शरीर दहन करुन नष्ट करतानाच्या पूर्ण प्रक्रियेचे संगतवार छायाचित्रण व व्हीडीओ चित्रीकरण करावे.
- दहन स्थळ सोडण्यापुर्वी मृत शरीर त्याच्या हाडांसहीत पुर्णपणे जळाल्याची खात्री करावी.
- मृत शरीर संपुर्ण जळाल्याची खात्री केल्यानंतर शवविच्छेदन चमु व संबंधीत नियंत्रण अधिकारी यांची स्वाक्षरी असलेला, मृत शरीरदहन केल्याबाबतचा पंचनामा तयार करुन अंतिम अहवाल (अनुसूची – 1 प्रमाणे) मुख्य वन्यजीव रक्षक यांना सादर करुन, त्यांची प्रत संबंधीत छायाचित्रे व दस्ताऐवजासह राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांना पृष्ठांकित करावी.

(ii) शरीराचे अवयवांची जप्ती झाली असल्यास (कातडी सुकी किंवा ताजी / हाडे / मांस किंवा इतर शरीर अवयव)

- वाघ मृत्यु / शरीर अवयवाची जप्तीबाबत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने जारी केलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दतीचा अवलंब करावा.



- शरीर अवयव जप्ती प्रकरणी फिर्यादी पक्षास या अवयवांची

पुरावा म्हणुन न्यायालयासमक्ष दाखविण्याची गरज असु







शकते म्हणुन अशा प्रकरणी संबंधित न्यायालयाच्या परवानगी आदेशाशिवाय अवयव नष्ट करु नयेत.

- परवानगी आदेश मिळाल्यानंतर सक्षम अधिकाऱ्याने नागरी सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधीचा समावेश असलेल्या चमु व्यतिरिक्त (शव विच्छेदनासाठी ठरवुन दिलेल्या चमु प्रमाणे) क्षेत्र संचालक किंवा वनसंरक्षक पदापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका–यांच्या उपस्थितीत अवयवांचे दहन करुन ते नष्ट करावेत.
- शरीराचे अवयव दहन करतानाच्या पूर्ण प्रक्रियेचे संगतवार छायाचित्रण व व्हीडीओ चित्रीकरण करावे.
- दहन स्थळ सोडण्यापुर्वी सर्व शरीराचे अवयव पुर्णपणे जळाल्याची खात्री करावी.

- सर्व शरीर अवयव संपुर्ण जळाल्याची खात्री केल्यानंतर शवविच्छेदन चमु व संबंधित नियंत्रण अधिकारी यांची स्वाक्षरी असलेल्या सर्व शरीर अवयव दहन केल्याबाबतचा





पंचनामा तयार करुन अंतिम अहवाल (जोडपत्र –1 प्रमाणे) मुख्य वन्यजीव रक्षक यांना सादर करुन त्याची प्रत संबंधीत छायाचित्रे व दस्ताऐवजासह राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांना पृष्ठांकित करावी.

(iii) जप्ती / सरकारजमा करतेवेळी हस्तगत केलेल्या मृगयाचिन्हांच्या संदर्भात.

- ज्यांच्या संदर्भात न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही, अशी हस्तगत केलेली सर्व मृगयाचिन्हे (नागरी सामाजिक संस्थांच्या प्रतिनीधीचा समावेश असलेल्या शवविच्छेदन चमु समोरच) क्षेत्रसंचालक किंवा वनसंरक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिका-यांच्या उपस्थितीत अवयवांचे दहन करुन ती नष्ट करावीत.



- शरीर अवयवांचे दहन करुन नष्ट करतानाच्या पूर्ण प्रक्रियेचे संगतवार छायाचित्रण व व्हीडीओ चित्रीकरण करावे.
- दहन स्थळ सोडण्यापूर्वी सर्व मृगयाचिन्हाचे भाग पूर्णपणे जळाल्याची खात्री करावी.
- सर्व शरीर अवयव संपूर्ण जळाल्याची खात्री केल्यानंतर शवविच्छेदन चमु व संबंधित नियंत्रण अधिकारी यांची स्वाक्षरी असलेला सर्व शरीर अवयव दहन केल्याबाबतचा पंचनामा तयार करुन अंतिम अहवाल (जोडपत्र –1 प्रमाणे) मुख्य वन्यजीव रक्षक यांना सादर करुन त्याची प्रत संबंधीत छायाचित्रे व दस्ताऐवजासह राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांना पृष्ठांकित करावी.
- हस्तगत केलेली मृगयाचिन्हे नष्ट करतांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972 मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे..



जोडपत्र –1
अंतिम अहवाल
वाघ / बिबटचे मृत शरीर /अवयवांची जप्ती / मृगयाचिन्हांची विल्हेवाट करतांना सादर करावयाची माहिती

1.	कार्यालयाचे नाव	
2.	वाघाच्या मृत्यु स्थळाचे वर्णन/अक्षांश रेखांश/वनखंड क्रमांक/ वनपरिक्षेत्र/ उपवनविभाग/वनविभाग/व्याघ्र प्रकल्प किंवा ठिकाण/ वेळ	
3.	मृत्युचा दिनांक/शवाचा अहवाल	
4.	जप्त शवाची किंवा जप्त केलेल्या अवयवांची स्थिती दर्शविणारी सविस्तर माहिती	
5.	प्रथम माहिती देणा–या इसमाचे अथवा कर्मचा–यांचे नाव/गाव/पत्ता व संर्पकाचा तपशील/दुरध्वनी क्रमांक/ईमेल	
6.	शवाबाबत : दिनांक, वेळ आणि शव विच्छेदनाचे ठिकाण	
7.	शव विच्छेदन पथकातील व्यक्तींची (नावे/हुद्दा/पत्ता/संपर्काचा तपशील	
8.	हरवलेल्या अवयवांचा तपशील	
9.	शव विच्छेदन अहवाल नंतर निष्पन्न झालेले मृत्युचे कारण (शव विच्छेदन अहवालाची प्रत जोडणे)	
10.	शवाचा रंगीत फोटो(जवळुन घेतलेला, जखम असल्यास ती दर्शविणारा), कॅमेरा ट्रॅपच्या फोटो डेटाबेस (संग्रह)शी तुलना केल्याचा तपशिल.	
11.	मृत्युचे कारण :– नैसर्गिक/शिकार	
12.	शिकार/जप्त केलेल्या अवयवांबाबत :–	
	i) करण्यात आलेली/प्रस्तावित कार्यवाही	
	ii) जप्त केलेल्या शरीराच्या भागाचे रंगीत फोटोग्राफ जोडावे	
	iii) (हाडाचे तुकडे/मांस/शरीराचे इतर भाग, ज्यावरुन प्राण्यांची ओळख पटत नसल्यास), प्रजातीची ओळख बाबतचे प्रमाणपत्र जोडावे.	
	iv) गुन्हेगार /संशयितावर(जर अटक केली असल्यास)केलेली कारवाई	
	v) केस/तक्रारीची सद्यःस्थितीः क्रमांक, तक्रार दाखल केल्याची दिनांक, कायदयाची कलमे, तक्रार दाखल केलेल्या न्यायालयाचे नाव	
13.	मृत शरीर /शरीराचे अवयव विल्हेवाट लावल्याचा पंचनामा/मेमो	सोबत जोडला आहे/नाही
14.	शेरा (जर असेल)	
15.	संबंधीत क्षेत्राच्या नियंत्रण अधिकाऱ्याची सही,नाव,पदनाम,दिनांक आणि शिक्का	

(ही कार्य पध्दती व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रिय अधिकारी यांच्या सल्ल्याने बनविली)



भाग – 3

वाघाचा मृत्यु झाल्यास वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धति

(Standard Operating Procedure for Dealing with Tiger Death)



जानेवारी, 2013

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली
पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार

वाघाचा मृत्यु झाल्यास वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धति

1. शीर्षक (Title) : वाघाचा मृत्यु झाल्यास वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धति
2. विषय (Subject) : वाघाचा मृत्यु / वाघाच्या अवयवांची जप्ती.
3. संदर्भ (Reference) : व्याघ्र प्रकल्प विषयावर राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण कडुन प्राप्त सल्ला.
4. हेतु (Purpose) : वाघाच्या मृत्युला कारणीभूत ठरलेल्या घटकांच्या कारणांची शहानिशा करणे आणि वाघांच्या संरक्षणासाठी तार्किक निर्णयाप्रत पोहोचणे.
5. संक्षिप्त सारांश (Short Summary) : या प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धतीमुळे वाघाच्या मृत्युच्या घटनांमध्ये जेव्हा त्याचे शव प्राप्त झाले आहे किंवा त्याचे अवयव जप्त करण्यात आले आहेत, अशा वेळी कार्यक्षेत्र स्तरावर वाघाच्या संरक्षित क्षेत्रात किंवा तत्सम क्षेत्रात घ्यावयाच्या मुलभूत आणि कमीतकमी उपायांची तरतूद करता येते.
6. व्याप्ती (Scope) : जेथे घटना घडल्या आहेत अशा वाघांचे आरक्षित क्षेत्रासह सर्व प्रकारच्या वनांसाठी ही प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती लागू आहे.
7. जबाबदारी (Responsibilities) : क्षेत्र संचालक वाघाच्या संरक्षित क्षेत्राकरिता जबाबदार असतील. राष्ट्रीय उद्याने / वन्यजीव अभयारण्य वगैरे संरक्षित क्षेत्रासाठी संबंधीत संरक्षित क्षेत्र व्यवस्थापक जबाबदार असतील. वन्यप्राणी (संरक्षण) कायदा, 1972 अन्वये बाकीच्या म्हणजे महसूलक्षेत्र / संवर्धन राखीव क्षेत्र / लोकसंवर्धन राखीव क्षेत्र किंवा खेडे आणि गाव इ. साठी ज्यांच्या कार्यक्षेत्रात नमूद क्षेत्र येते ते विभागीय वन



अधिकारी / उपवनसंरक्षक जबाबदार राहतील. राज्य स्तरावर ही जबाबदारी संबंधीत राज्याच्या मुख्य वन्यजीव रक्षकाची राहील.

8. वाघाचा मृत्यु / वाघाच्या अवयवांची जप्ती / किंवा जेथे घटनेची नोंद झाली आहे परंतु वाघाचे अवयव मिळाले नाही / शव मिळाले पण तेथे इतर परिपोषक क्षेत्रीय पुरावा मिळवण्यासाठी जी कार्यपद्धती वापरायची आहे, त्याबाबतच्या सखोल सूचना.

(I) अ) अपराधाच्या जागेवर / घटना स्थळी (जबाबदारी : वनपरिक्षेत्र अधिकारी, सहायक निदेशक / सहायक वन संरक्षक, उपनिदेशक / विभागीय वन अधिकारी)

- लवकरात लवकर घटना स्थळी पोहचावे. त्याचवेळी कार्यक्षेत्राचे क्षेत्रसंचालक / वनसंरक्षक / मुख्य वन संरक्षक यांना तसे कळवावे.
- तपासणी चमूला (Investigation Team) घटनास्थळी ताबडतोब बोलवावे. तपासणी चमूला सोबत तपासणी साहित्य (कीट) आणणे बंधनकारक आहे.



- दोराने किंवा टेपने घटना स्थळाभोवती कडे करावे. जेणेकरुन पुराव्यात ढवळाढवळ होणार नाही.
- अबाधित घटनास्थळाचे वेगवेगळ्या कोनातून फोटो घ्यावे / चित्रीकरण करावे म्हणजे त्याची तुलना कॅमेरा ट्रॅप रेकॉर्डींगशी (आधी केले असल्यास) करता येईल. फोटो किंवा व्हिडिओ चित्रीकरण जवळून व दुरुन अशा दोन्ही पद्धतीने करावे. घटनास्थळी सापडलेल्या विविध वस्तूचे अंतर दाखविण्यासाठी टेप

वापरावी. घटनास्थळाचे परिस्थितीजन्य निरिक्षण करुन ते तपशीलवार नोंदवावे.

- पुराव्यात लबाडीने बदल करु नये.
- संपूर्ण क्षेत्र तपासाकरिता आणि पुरावा गोळा करण्यासाठी चौरस चौकटीत (Grids) किंवा मंडलांमध्ये (Circles) विभागावे.
- बारीकसारीक तपशीलाची नोंद करावी, जसे दिनांक, वेळ, जीपीएस स्थळ, हवामान, इ. तपासकार्यात घेतलेल्या प्रत्येक पायरीची आणि कार्यवाहीची व्यवस्थित नोंद करावी. तपास अधिकाऱ्याने फौजदारी व्यवहारसंहितेच्या कलम 172 (CrPC Sec. 172) प्रमाणे प्रकरण रोजनिशी लिहीणे सुरु करावे अशी शिफारस आहे; आणि ही रोजनिशी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दररोज सादर करावी.
- जप्तीनामा / अटक पत्र घटनास्थळी तयार करावेत.
- शोध, जप्ती आणि अटकेच्या वेळी 2 स्वतंत्र साक्षीदार, जेथे शक्य असेल, त्या ठिकाणी सोबत असावेत.
- संपूर्ण क्षेत्राचे सर्वेक्षण करावे. जेथे प्राण्यांची झूंज झाली असेल अशा ठिकाणी, दुसऱ्या जखमी प्राण्याचा शक्य तसा मागोवा (Trail) घ्यावा.
- घटनास्थळापासून किमान 500 मी. वर्तूळाकार जागेचा पुरावा मिळण्यासाठी व्यवस्थित शोध घ्यावा. बरेचदा असे आढळून आले आहे कि, वन्यप्राण्याला गोळी लागल्यानंतर किंवा विषबाधा झाल्यावर तो प्राणी घटनास्थळापासून काहीसा दूर जातो. अवैध शिकारी सुद्धा प्राण्याच्या कलेवराला काही अंतरावर सोईच्या ठिकाणी घेवून जातात, आणि तेथे त्याचे कातडे वेगळे करतात.
- घटनास्थळाजवळ असलेले नदी, तलाव किंवा इतर पाण्याचे साठे इ.चा पुरावा मिळविण्यासाठी शोध घ्यावा, कारण अवैध शिकारी अंग धुण्यासाठी किंवा कातडी काढण्याकरिता, शस्त्रे साफ करण्यासाठी



पाण्याचा वापर करतात. काही वेळा असे निदर्शनास आले आहे कि अवैध शिकारी नदी काठाने चालत जावून वाघाच्या संरक्षित क्षेत्रात प्रवेश करतात.

- शक्य असल्यास प्राण्याच्या पावलांचे ठसे/माणसाचे (पाऊल, चप्पल, जोडा इ.) ठसे / वाहनाच्या चाकाच्या खुणांचे प्लॅस्टर ऑफ पॅरिस वापरुन ठसे (कास्ट) घ्यावेत.
- सर्व संभावित पुराव्यांचा त्यांच्या मुळस्थितीत काळजीपूर्वक शोध घेवून ते गोळा करावेत. पुराव्यांची गरज असल्यास ते जतन करावे.
- जमीनीवर, डोळ्याच्या उंचीवर तसेच त्यापेक्षा जास्त उंचीवर असलेल्या भागांचा पुराव्यासाठी शोध घ्यावा. (उदा. छुप्या जागा/मचान/झाडावरील गोळ्यांचे निशान/ ताज्या तुटलेल्या फांद्या/जमिनीवर कोठे आग पेटवली असल्यास, जळलेल्या आगकाड्या वगैरे). ज्या ठिकाणाहुन नमुने एकत्रित करावयाचे त्या जागा; उदा. त्या ठिकाणाहुन रक्त/ शरीरद्रव्य/पेशी (उती)/केस/केसाळ कातडी /दात/हाडाचे तुकडे इ. तसेच गन पावडर, कापडाचे तुकडे, धागे, तंतू/रंगाचे टवके अथवा पोपडे/माती/गोळीचे काडतुसाचे आवरण/गोळ्या/ पायांचे ठसे/चाकाच्या खुणा/गुटका पाकिट/आगकाड्या/अन्न वस्तु/जलसाठ्याचे पाणी इ. वस्तुंचे नमुने गोळा करावेत.
- घटनास्थळी सापडलेली हत्यारे, साहित्य सुरक्षितपणे ठेवावी. जेणेकरुन त्यावरील बोटांचे ठसे किंवा डाग वगैरे चांगल्या स्थितित राहतील.
- एखादेवेळी आरोपीने अंगात घातलेले कपडे रक्ताच्या, द्रावाच्या डागाकरिता वगैरे जप्त करावे लागतात. जर कातडी काढण्याचा संशय असल्यास, आरोपीच्या नखांचे नमूने घ्यावेत.
- नमुने गोळा करण्याकरिता पारदर्शक पॉलिथीन पिशव्या वापराव्या.
- प्रत्येक नमुना किंवा वस्तु स्वतंत्र पॉलिथीन पिशवीत गोळा करावी.

सर्व वस्तु एकाच पिशवित संग्रहित करु नये.

- गोळा केलेले नमूने : विशेषज्ञांकडे / कोर्टात पाठवायचे असतात. नमुने पाठविलेल्या पत्रांची तिसरी प्रत कार्यालयातील सरकारी फाईलमध्ये ठेवावी.
- गोळा केलेल्या नमुन्याकरिता व्यवस्थित खुणपट्टी (लेबल) तयार करा आणि चिपकवा आणि शिक्का लावा. प्रत्येक नमुन्याला वेगळा दर्शक क्रमांक देवून त्याचे संक्षिप्त वर्णन जोडावे. पळुन जायचे किंवा बाहेर निघायचे सर्व मार्ग, रस्ते, वाटा इ.चा शोध घ्यावा. त्यासाठी, उपलब्ध असल्यास, प्रशिक्षित कुत्र्यांचा वापर करावा.



- प्राण्याचे शव त्याला झालेल्या जखमा, गोळ्यांचे निशाण, गोळीने झालेली जखम, विषबाधेची लक्षणे इत्यादी बाह्य पुराव्यांची काळजीपूर्वक नोंद करावी. शिवाय प्राण्याच्या शवाचे शक्य असल्यास, माप घ्यावे. शवावर दिसलेल्या जखमांचे व्यवस्थित मोजमाप घ्यावे; त्यांचे वर्णन करावे, त्याबाबत खुलासा नोंदवावा.
- चमु उपलब्ध असल्यास, शवाची मरणोत्तर तपासणी करुन घ्यावी, अन्यथा शव अतिशीत पेटीत ठेवावे. मरणोत्तर तपासणी केवळ दिवसा उजेडी



करावी.

- शवाची मरणोत्तर तपासणी (Post Mortem) करतांना व्हिसेरा व टिश्यूजचे नमुने गोळा करावेत. व्हिसेराचे नमुने नामवंत न्याय सहायक प्रयोगशाळेला पाठवावेत. टिश्यूजचे नमूने भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून, भारत सरकार (W.I.I.) कडे किंवा देशातील इतर मान्यताप्राप्त संस्थेकडे जेथे D.N.A. प्रोफाईलिंग आणि हिस्टोपॅथॉलाजीची सोय आहे अशा ठिकाणी पाठवावे.
- मरणोत्तर तपासणी (Post Mortem) अहवाल पूर्ण करुन तो मुख्य वन्यजीव रक्षक (Chief Wildlife Warden) यांचेकडे पाठवावा. त्याची प्रत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे पाठवावी.
- कायद्यातील तरतुदीप्रमाणे आणि सक्षम अधिका-याच्या उपस्थितीत प्राण्याच्या शवाची विल्हेवाट लावावी. प्राण्याच्या अवयवांची जप्ती केली असल्यास, ते जर कोर्टात खटला चालविण्यासाठी पुरावा म्हणून हजर करायचे असतील तर त्यांची विल्हेवाट न लावता, संबंधित न्यायालयाचा आदेश प्राप्त झाल्यावरच त्यांची विल्हेवाट लावावी.
- विभागाचा प्रारंभिक गुन्हा अहवाल (POR) / अथवा एफ.आय.आर. (FIR) वगैरे जारी करावा.
- जप्तीनामा आणि अटकेचा मेमो आरोपीच्या सहीसहित (हजर असल्यास) तयार करावेत. त्यात साक्षीदारांच्या सह्या, घटनास्थळाचा नकाशा आणि वनअधिका-याचे प्राण्याच्या जातीची ओळख पटवल्याचे प्रमाणपत्र असले पाहिजे. या वनअधिका-याचे पद सहायक वन संरक्षकाचे खालचे नसावे आणि त्याने प्राण्याची प्रजाती आपल्या या क्षेत्रातील प्रशिक्षणाच्या आणि अनुभवाच्या आधारावर ओळखल्याचे प्रमाणित केले पाहिजे.

(ii) **जर संशयिताला (संशयितांना) अटक झाली असेल तर :**

- संशयिताची पुढील माहिती, जसे नाव पत्ता, शरिराचा तपशील, फोटोग्राफ, उंची, वजन वगैरे एकत्रित करावी. त्याची झडती घेतांना/अटक करतांना/विचारपूस करतांना, टेलिफोन नंबर, मोबाईलनंबर, रोजनिशी, त्यात कागदावर केलेली आकडेमोड इ. समाविष्ट, इ. जप्त करण्यासाठी/ मिळविण्यासाठी विशेष काळजी घ्यावी. त्याचे लागेबांधे ठावठिकाणा शोधण्यासाठी ही माहिती निर्णायक असु शकते. अटक केलेल्या व्यक्तिला त्याने केलेल्या गुन्ह्याचा तपशील आणि अटक करण्याचे कारण देणे आवश्यक आहे. (फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम 50 प्रमाणे तसेच भारतीय संविधानाचे 22 कलमाप्रमाणे).
- ज्यात अटकेचे कारण आणि आधार दिले आहेत असा अटक पंचनामा तयार करावा आणि त्यात कारणे व आधार यांचा उल्लेख करावा.
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या कलम 50(8) (WLPA) नुसार संशयितांचे आणि/ किंवा साक्षीदारांचे त्यांच्या सहीसहित जबाबांची नोंद करावी. हे जबाब सहायक वनसंरक्षक किंवा त्यावरील अधिकाऱ्याने, ज्यांना या संबंधात राज्यशासनाने प्राधिकृत केले आहे आणि जे वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे आवश्यक आहे, नोंदवावे.
- फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम 50 प्रमाणे आणि जोगिंदरसिंग प्रकरणातील सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार, आरोपीने नामित केलेल्या व्यक्तिला आरोपीच्या अटकेची तसेच त्याला कोठे ठेवले आहे याची माहिती द्यावी.
- अटक केलेल्या संशयित आरोपीची माहिती : आरोपीची वैद्यकिय तपासणी करण्याची व्यवस्था करावी, आणि त्याला 24 तासाच्या आंत संबंधित मॅजिस्ट्रेट समोर हजर करावे. जर आरोपीचे मागचे



पुढचे संबंध, धागेदोरे शोधणे गरजेचे वाटत असले तर त्याच्या रिमांडसाठी तसा अर्ज द्यावा. ह्यासाठी तुमच्या स्थानिक न्यायालयातील पब्लीक प्रॉसिक्युटरशी संपर्क साधावा जेणेकरुन आरोपीचा रिमांड मिळवता येईल.

- जर आरोपी महिला असेल; तर तिची वैद्यकिय तपासणी केवळ अधिकृत नोंदणी असलेल्या महिला वैद्यकिय व्यवसायिकाकडून करणे आवश्यक आहे.
- जोपर्यंत आरोपी तुमच्या ताब्यात आहे, तोपर्यंत त्याच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची व्यवस्थित काळजी घ्या. जर आरोपी विभागाच्या कोठडीत असतांना आजारी पडला तर त्याला वैद्यकिय मदत पुरवावी किंवा त्याला उपचारासाठी दवाखान्यात भरती करणे आवश्यक आहे.
- प्रश्नोत्तराद्वारे आणि सूचक धाग्याद्वारे प्रकरणाची कसून चौकशी करावी; यांत मागचे पुढचे संबंध प्रस्थापित करुन आरोपीने दिलेल्या कबुलीजबाबानुसार आणि माहितीनुसार इतर लोकांना अटक करावी.
- अटक केलेल्या व्यक्तीस स्वतःचे रक्षण करण्यासाठी त्याने निवडलेल्या कायदेशीर सल्लागाराचा सल्ला घेण्याचा अधिकार आहे. (भारतीय संविधान 22 (1) प्रमाणे).
- जर अटक केलेला आरोपी गरीब असेल तर त्याला कायदेशीर सेवा संस्थेकडून फुकट कायदेशीर सल्ला मिळण्याची तरतूद आहे. (भारतीय संविधान 39 (अ) प्रमाणे)
- केवळ संशयाच्या आधारावर अटक करु नये. (फौजदारी व्यवहारसंहिता, कलम 145 प्रमाणे)
- जर कारणाशिवाय अटक झाली असेल किंवा बेकायदेशीररित्या अडकवले असेल तर अशा व्यक्तीस भरपाई मिळण्याची तरतूद आहे.

- मनोविश्लेषण तपासणी अंतर्गत आरोपीने दिलेल्या निवेदनाला तसा पुरावा म्हणुन गौण महत्त्व असले तरी अट्टल गुन्हेगारांच्या बाबतीत जे तपासात सहयोग देत नाही, अशा तपासणीची शिफारस करण्यास हरकत असू नये.
- अंतिम अहवाल तयार करुन वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या कलम 55 नुसार तक्रार तयार करावी आणि ती न्यायालयांत दाखल करावी.
- वन्यजीवांच्या मृत्युच्या कारणासंबंधी अंतिम अहवाल मुख्य वन्यजीवरक्षकांना सादर करावा. हा अहवाल संबंधित क्षेत्र संचालक / वन्यजीव रक्षक / वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक यांनी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला मुख्य वन्यजीव रक्षक मार्फत सादर करावा.
- जोडपत्र – 01 मध्ये अटक तथा व्यक्तिशः घेतलेल्या झडतीचा मेमो प्रपत्र दिलेले आहे.

iii) संबंधित क्षेत्र संचालक / वन्यजीव रक्षक / मुख्य वनसंरक्षक / नियंत्रण कक्ष यांच्याकडून करावयाची कार्यवाही.

- घटनेची प्रारंभिक सुचना राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण / मुख्य वन्यजीव रक्षक / क्षेत्रीय उपनिदेशक (आर.डी.डी)/ WCC Bureau ला त्वरीत पाठवावी. (एस.एम.एस / इ–मेल / दुरध्वनीद्वारे सुचना / फॅक्सद्वारे)
- राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या वर्तननियमानुसार (Protocol) मरणोत्तर शव तपासणीसाठी चमू तयार करणे.
- तपास चमू पाठवावा. तपास अधिकारी नियुक्त करुन त्याप्रमाणे कार्यालयीन आदेश जारी करावा.
- पूर्वीचे आणि सध्याचे गुप्तवार्ता अहवालाचे विश्लेषण करुन त्यातुन काही सुत्र गवसते काय ते पहावे; अट्टल गुन्हेगारांचे / संशयितांचे



मोबाईलचे रेकार्ड्स तपासावे; त्याचप्रमाणे बाजुच्या जिल्ह्यांत, विभागात, राज्यात त्याविषयी खातरजमा करुन घ्यावी.

- बॅरीयर वर नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी करावी, स्थानीक पोलिसांना कळवावे आणि धोक्याची सूचना जारी करुन बाहेर जाण्याच्या सर्व मार्गांवर वाहनांची तपासणी करावी.
- कलेवराच्या फोटोग्राफची तपासणी करुन त्यांची राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणातील नॅशनल रिपोझटरीच्या कॅमेरा ट्रॅप (NCRTPT) मधे असलेल्या छायाचित्राबरोबर तूलना करावी, किंवा ही तूलना टप्पा–IV कॅमेरा ट्रॅप मॉनीटोरींग डेटाबेस किंवा इतर संशोधन डेटाबेस बरोबर करुन त्याची आणि स्थळाची ओळख पटवावी.
- मुख्य वन्यजीव रक्षकाच्या मार्फत घटनेचा शासकीय आशय प्रसृत करावा.
- मुख्य वनसंरक्षकाच्या मार्फत आरोपीचे शारिरिक वर्णनाचा तपशील राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे पाठवावा, जेणेकरुन इतर क्षेत्र संचालक / राज्ये / वन्यजीव गुन्हा नियंत्रण ब्युरो (WCCB), इ. ना. सचेत करता येईल. त्याचप्रमाणे इतरत्र घडलेल्या गुन्ह्याचा सदरहु गुन्ह्यांशी संबंध असलेल्या शक्यतेचा पडताळा घेता येईल.
- तपासकामाचे व्यवस्थित पर्यवेक्षण आणि बारकाईने नियमित संनियत्रन (मॉनीटोरींग) करावे. पोलिस विभागाशी संपर्क साधुन असावे. त्याचप्रमाणे राज्याचे व्याघ्र कक्ष (उपलब्ध असल्यास) वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो व इतर तपास संस्थांच्या संपर्कात असावे.
- अंतिम अहवाल तयार करुन तो मुख्य वन्यजीव रक्षकांना सादर करावा आणि त्याप्रमाणे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला कळवावे. जोपर्यंत वाघाचा मृत्यू नैसर्गिकरित्या झाला याचे स्पष्टीकरण राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला पुराव्यासह मिळत

नाही, तोपर्यंत सर्व वाघांचा मृत्यु अवैध शिकारीमुळे झाला असे ते समजतात.

- सर्व अवैध शिकारीची आणि जप्तीची प्रकरणे कार्यकक्षेतील संबंधित न्यायालयात दाखल करावीत.
- न्यायालयात चालू असलेल्या प्रकरणांचे जोपर्यंत त्यांचा निर्णय होत नाही तोपर्यंत बारकाईने नियमित संनियंत्रण (मॉनीटरींग) करित राहवेत.
- न्यायालयीन आदेशानंतर सदर प्रकरणाचे विश्लेषण करून सुधारात्मक कार्यवाही (गरज असल्यास) करणेकरिता वरिष्ठ न्यायालयात अपील करणे.
- जर न्यायालयीन आदेश समाधानकारक असल्यास प्रकरण बंद करावे आणि त्याचा अहवाल मुख्य वन्यजीव रक्षक यांना पाठवावा व राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनाही माहिती कळवावी.

जोडपत्र – अ

तक्रार पत्र तयार करण्याकरिता महत्त्वाचे मुद्दे

(Important Points for Preparing a Complaint)

- तक्रारपत्र तपासून घ्या/त्यामध्ये वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972 आणि इतर अधिनियमांची संबंधित कलमे, उदा. वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाची कलमे 2, 9, 50 इ. घातली आहेत याची खात्री करुन घ्या.
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972च्या कलम 50 (8) अन्वये साक्षीदाराचे जबाब आणि संशयितांचे कबुलीजबाब, (त्याशिवाय संबंधित कायद्याची कलमे घातली याची खात्री करुन घ्या).
- गुन्हा घडलेल्या स्थळाचा नकाशा. या संबंधात कंम्पार्टमेंट नकाशा सुद्धा उपयोगी ठरु शकतो.
- गुन्हा घडलेल्या स्थळाची स्थिति : संरक्षित क्षेत्र/व्याघ्र प्रकल्प वन विभाग/इतर क्षेत्र, जर ते क्षेत्र (व्याघ्र प्रकल्प / संरक्षित



क्षेत्र / संरक्षित वने / राखीव वने) असेल तर शासकिय अधिसूचनेची प्रत जोडावी.

- मरणोत्तर शव तपासणी अहवाल.
- विशेषज्ञांचे अहवाल; जसे भारतीय वन्यजीव संस्था, देहरादुन, झूलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया किंवा इतर नामवंत संस्था जेथे विशिष्ट/विशेष कार्य केले जाते. हा अहवाल जप्त केलेले भाग, तुकडे, टिश्यूज इ. विषयीचा असावा.
- जप्त केलेल्या मालावर लावलेल्या शिक्क्याची एक प्रत.
- तपासामध्ये घेतलेले फोटोग्राफस्, व्हिडीओ रेकॉर्डींग इत्यादीची सि.डी.
- जप्त केलेल्या मालमत्तेची/वस्तुंची, जसे घर, वाहन इत्यादीचे मालकी पत्र; तसेच ओळखपत्र, पुरावे, कार्ड्स इत्यादी.
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या किंवा इतर अधिनियमांच्या संबंधित कलमांची प्रत.
- जोडलेला दस्ताऐवज व साक्षीदार यांची यादी
- व्हिसेरा, बॅलिस्टिक शस्त्र, गोळी इत्यादीचा न्यायसहाय्यक किंवा इतर संबंधित प्रयोगशाळेचा अहवाल. (Foreinsic Report)
- तक्रार अर्जाचा नमूना जोडपत्र–2 मध्ये दिला आहे.
- तक्रार अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी आणि वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972 मधील कलम 55 अन्वये तक्रार अर्ज भरण्यासाठी आवश्यक मार्गदर्शिका इ. जोडपत्र 3 मध्ये दिली आहे.

अवैध शिकारीला प्रतिबंध /वाघाच्या संरक्षणासाठी करावयाच्या कार्यवाहीवरील टीप. (Note on Actions Needed for Antipoaching / Tiger Protection)

1) प्रत्येक प्रकरणाचा सखोल आणि परिपूर्ण तपास; अंतिम अहवालासह. त्यात कोणतीही बाब अपूर्ण किंवा अस्पष्ट ठेवलेली

नसावी.

2) प्रकरणातील मागचे पुढचे धागेदोरे, सीमापार असू शकणारे संबंध व त्याचे परिणाम, अवैध शिकारी, वाहक, व्यापारी, ग्राहक इत्यादीचे जाळे, हितसंबंध इत्यादीवर माहिती.
3) माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने / खबऱ्यांचे जाळे इत्यादी माध्यमातून अट्टल गुन्हेगार / संशयित इ. च्या हालचालींवर बारीक लक्ष.
4) व्हिसेरा अहवाल आणि मरणोत्तर शव तपासणी अहवालांचे परिक्षण.
5) संवेदनशील क्षेत्रात कडक गस्त घालणे; शिवाय अवैध शिकार प्रतिबंधासाठी मोहिम उघडणे.
6) तपास आणि गुप्तवार्ता मिळविण्याच्या कामात बहुशाखीय दृष्टीकोन असला पाहिजे. तसेच एकमेकांत सहकार्य असले पाहिजे. राज्यसरकार आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्यामार्फत वन्यजीव प्राधिकरणाने गुप्तवार्तासाठी आय.बी. / एल. आय.यु; तसेच अर्धसैनिक दलांशी म्हणजे बी.एस.एफ, सि.आर.पी. एफ. (केंद्रिय आरक्षित पोलिस दल), आसाम रायफल्स, एस.एस.बी. इ. सोबत संवेदनशील सीमा क्षेत्रात सोबत गस्त घालण्यासाठी वगैरेसाठी, एम.ओ.यु. (आपआपसातील सहमती)करार करावा.
7) योग्य त्या उच्चतम स्तरावर प्रत्येक वाघाच्या मृत्यु प्रकरणाचा नियमितपणे आढावा घ्यावा.
8) दर महिन्यात न्याय, पोलिस व महसूल खात्याबरोबर समन्वय सभा होईल याची खात्री करुन घ्या.
9) वाघासंबंधीच्या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी प्रत्येक व्याघ्र संरक्षित क्षेत्रात चांगले प्रशिक्षित अधिकारी / वनपरिक्षेत्र अधिकारी इ.ची. चमू असली पाहिजे. त्यांच्याकडे आधुनिक आणि शास्त्रीय अशी न्यायसहायक शास्त्राची (Forensic Science) साधने, यंत्रे असावीत. आवश्यक असेल तेव्हा राज्यसरकारने राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या माध्यमातुन काही निवडक आणि विशेष अशा तपास



चमूच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

10) तपास पूर्ण झालेली, न्यायालयात दाखल करावयाच्या योग्य त्या प्रकरणांची न्यायालयांत योग्य कार्यवाही होण्यासाठी, योग्य त्या उच्चतम स्तरावर, प्रलंबीत असलेल्या प्रकरणांचा नियमितपणे मागोवा होत राहील याची खातरजमा करावी.

11) राज्य आणि संरक्षित क्षेत्र स्तरावर संगणक सामुग्री/अट्टल गुन्हेगार सजा झालेले गुन्हेगार आणि संशयितांचा संपूर्ण माहितीची नोंद (डोसिअर) तयार करावे आणि त्यासंबंधी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला वेळोवेळी अवगत करावे. सर्व आरोपींचे व्यक्तिचित्रण (प्रोफाईल) तयार करावे. अट्टल गुन्हेगारांच्यावर पाळत ठेवण्यासाठी हिस्टरी शीट्स तयार कराव्यात. अशा प्रोफाईल्सच्या व हिस्टरी शीट्च्या प्रति राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला, वन्यजीव गुन्हा नियंत्रण ब्युरोला पाठवाव्या; तसेच त्यांचा वितरणासाठी व पाळत ठेवण्यासाठी उपयोग व्हावा. प्रोफाईलचा नमुना जोडपत्र–4 मध्ये दिला आहे.

12) प्रत्येक अवैध वाघ शिकार प्रकरणात गुन्हेगाराने वापरलेल्या पद्धतीची नोंद करुन त्याचे टिपण गुन्हा नियंत्रण ब्युरोला पाठवावे. याचा उपयोग गुन्हा थांबविण्यासाठी तसेच हे कार्य करणाऱ्या संस्थांमध्ये होत असलेल्या प्रशिक्षणाकरिता होऊ शकतो.

13) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने पाठविलेल्या मार्गदर्शिकेप्रमाणे प्रत्येक व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात 'सुरक्षा योजना' (Security Plan) कार्यरत असली पाहिजे.

14) अवैध शिकारीच्या धोक्याला सामोरे जाणे व तपास कामात सर्व संसाधने उपलब्ध राहील याची निश्चिती करावी.

15) वाघाच्या अस्तित्वाला अतिशय धोका असल्यामुळे त्याला वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या शेडुल–1 मध्ये सामिल केले आहे; त्यामुळे वाघांच्या गुन्हयासंबंधी प्रकरणांत, जे न्यायालयात दाखल

केले आहे, त्यावर लवकर निर्णय व्हावा म्हणून संबंधित क्षेत्र संचालक / वन्यजीव रक्षक / वनसंरक्षक / मुख्य वन संरक्षक ह्यांनी दर आठवड्यात अशा प्रकरणाचा आढावा घ्यावा व त्याची नियमित तपासणी (मॉनीटरींग) करावे.

16) राज्याच्या मुख्य वन्यजीव रक्षकांनी प्रत्येक व्याघ्र गुन्ह्याच्या न्यायालयीन प्रकरणात झालेल्या प्रगतीचा दर पंधरवाड्यात आढावा घ्यावा. राज्यांच्या प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) यांनी सुद्धा असा आढावा दर महिन्यात घ्यावा, आणि तसे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला त्यांनी अवगत करावे.

जोडपत्र –1

अटक तथा व्यक्तिशः घेतलेल्या झडतीचा मेमो

(Arrest cum Personal Search Memo)

(वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या कलम 50 (3) अन्वये.)

1) कार्यालयाचे नाव
2) प्रकरण क्र., दिनांक आणि कायद्याची कलमे
3) अटक झालेल्या आरोपीचे नाव, वडिलांचे नाव आणि वय
4) अटक झालेल्या आरोपीचा सध्याचा आणि स्थायी पत्ता
5) अटक झालेल्या आरोपीची ओळख पटविणारी खुण / खुणा
6) अटकेचे कारण; वारंटसहित किंवा वारंटशिवाय.
7) अटकेचे स्थळ, दिनांक आणि वेळ.
8) आरोपीजवळ सापडलेली कागदपत्रे / वस्तु
9) अटकेच्या वेळी हजर असणाऱ्या स्वतंत्र साक्षीदाराचे नाव व पत्ता
10) ज्या अधिकाऱ्याने अटक केली त्याचे नाव आणि पद.
11) आरोपीने अटकेच्या वेळी सांगितलेले अशा



नातेवाईक / मित्राचे नाव, ज्यांना आरोपीच्या अटकेची बातमी कळवली आहे.

12) स्थानिक पोलिस स्टेशनचे नाव जेथे आरोपीला अटकेत ठेवायचे आहे; किंवा दुसरी एखादी जागा जेथे आरोपीला ठेवायचे आहे.

13) अशी कोणतीही माहिती, जसे, अटकेतील व्यक्तीच्या शरिरावर असलेल्या / झालेल्या जखमा, काही असल्यास

14) अटक केलेल्या आरोपीची सही.

15) स्वतंत्र साक्षीदाराची सही

16) ज्या अधिकाऱ्याने अटक केली त्याचे नाव, पद व हस्ताक्षर

————————

जोडपत्र–2
वन्यजीव गुन्ह्याची तक्रार
(Complaint in Wildlife Offence)

(वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972, कलम 55 सह वाचलेले फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम 200 अन्वये)

1) कार्यालयाचे नाव
2) गुन्हा अहवाल क्र. आणि वेळ
3) गुन्ह्याचे स्थळ, दिनांक आणि वेळ
4) कायद्यांची कलमे
5) जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशील
6) जप्त केलेला माल कोणाच्या ताब्यात आहे, जर तो कोर्टाला सादर केला असेल तर प्रॉपर्टी इन्डेक्स नंबर
7) जप्त केलेला जीवंत प्राणी, जर असल्यास, आणि न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नंतर वनात त्याच्या नैसर्गिक वस्ती स्थानात ठेवलेला.

8) जप्त केलेल्या नाश पावणाऱ्या किंवा हानिकारक वस्तूंचा तपशील; ज्या नंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नष्ट केल्या आहेत.

9) जप्त केलेल्या (जर केल्यास) बंदुकी वगैरे सारख्या शस्त्रांचा आणि त्या तपासाकरिता पोलिसाकडे पाठवल्या त्याचा तपशील; तसेच पोलिस एफ.आय.आर. क्र.

10) परिक्षणाकरिता नमुने भारतीय वन्यजीव जीव संस्था / झूलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया / बॉटनीकल सर्वे ऑफ इंडिया किंवा इतर संस्थाकडे, त्यांच्या शास्त्रीय विशेषज्ञाच्या मतांसाठी पाठविलेत काय? जर पाठविले असेल, तर जे मत प्राप्त झाले त्याचा तपशील.

11) ज्याने गुन्ह्याचा अहवाल दाखल केला त्या अधिकाऱ्याचे नाव, पद आणि कार्यालयाचा पत्ता.

12) ज्याने तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव, पद आणि कार्यालयाचा पत्ता.

13) आरोपीचे नाव व पत्ता ज्याचे विरुद्ध तक्रारदाखल केली.

- **i.** आरोपी ताब्यात आहे
- **ii.** आरोपी जमानतीवर आहे.
- **Iii.** आरोपीला अटक झाली नाही / आरोपी बेपत्ता, फरार आहे.
- **iv.** जर आरोपी सराईत आणि पुन्हा पुन्हा गुन्हा करणारा असेल, तर त्याच्या पुर्वीच्या प्रकरणांचा तपशील.

14) साक्षीदाराचे नाव आणि पत्ता; आणि प्रत्येक साक्षीदाराच्या पुराव्याने सिद्ध करावयाची बाब.

15) तक्रार पत्राबरोबर जोडलेल्या कागदपत्रांची (जर असल्यास) यादी.

16) गुन्हयाचे स्वरुप, प्रकरणाची सत्य परिस्थीति / आरोपीच्या



विरुध्द करण्यात आलेले आरोप.

तक्रार कर्त्याचे नाव, पद
आणि कार्यालयाचा शिक्का

प्रति,
मुख्य न्यायालयीन दंडाधिकारी /
न्यायालयीन दंडाधिकारी प्रथम श्रेणी.

———————————

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972च्या कलम 55 अन्वये तक्रार दाखल करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे :
(Guidelines for Filing Complaint)

- ज्या अधिकाऱ्याला तक्रार दाखल करावयाची आहे, त्याला त्यासाठी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या कलम 55 अन्वये प्राधिकृत केलेले असावे.
- जर आरोपी न्यायालयीन कोठडीत असेल तर, तक्रार त्याच्या अटकेच्या तारखेच्यापासून 60 दिवसांच्या आत केली पाहिजे. जर एकापेक्षा जास्त आरोपी असतील तर 60 दिवसांची मुदत पहिल्या आरोपीला केलेल्या अटकेच्या तारखेपासून सुरु होइल.
- तक्रार टंकलिखित असल्यास उत्तम, किंवा ती सुवाच्च अक्षरात खाडाखोड न करता लिहिलेली असावी.
- सर्व आरोपींचे पूर्ण तपशील आणि त्यांची व्यक्तीशः गुन्ह्यात

असलेली भुमिका, तसेच अधिनियमांच्या संबंधित कलमांचा हवाला देवून आरोपीने व्यक्तिशः केलेल्या गुन्ह्याचा तक्रारीत उल्लेख झाला पाहिजे. आरोपीची सध्याची स्थिति; म्हणजे आरोपी जामिनावर आहे की न्यायालयीन कोठडीत आहे की बेपत्ता आहे. आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे तर तो कोणत्या जेलमध्ये आहे. आरोपी बेपत्ता असेल तर तपास अधिकाऱ्याने त्याला पकडण्यासाठी काय प्रयत्न केले, तसेच फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम 82, 83 प्रमाणे काय कार्यवाही केली, त्याचा उल्लेख तक्रारीत करावा.

- तक्रार ही नेमकी असावी, त्यात संदिग्धता नसावी. तक्रारीमध्ये पुराव्याविना असलेल्या माहितीचा उल्लेख करू नये तसेच आरोपी विरूध्द पुरेशे पुरावे असल्याशिवाय त्याचे नाव तक्रारीमध्ये देवु नये. प्रकरणाची माहिती आणि परिस्थिती इत्यादी सोप्या भाषेत क्रमवारीने द्यावी, साक्षीदारांची यादी, कागदपत्रे आणि वस्तु इत्यादी तक्रारीबरोबर सादर कराव्यात. तक्रार करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्याने तक्रारपत्राच्या सर्व पृष्ठांवर आणि सर्व जोडपत्रांवर सह्या कराव्यात.
- साक्षीदारांच्या यादीप्रमाणे, असलेले साक्षीदारांचे जबाब ज्यात शासकिय साक्षीदारांचे जबाब सुद्धा सामिल आहे, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या कलम 50(8) प्रमाणे नोंदलेले असावेत. आरोपीचे गुन्हा कबुलीचे जबाब आणि फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम 164 प्रमाणे दंडाधिकाऱ्यांनी नोंदवलेले जबाब इत्यादी तक्रारींबरोबर दाखल करावे.
- सर्व कागदपत्रे मुळ स्थितितील किंवा प्रमाणित प्रतीमध्ये, त्यांच्या दिलेल्या यादीप्रमाणे, तक्रारीबरोबर लावलेली असावी. जी कागदपत्रे तक्रारीबरोबर जोडणे आवश्यक आहेत; त्यांची संपूर्ण यादी खाली दिल्याप्रमाणे आहे. (जोडपत्र– 3)



जोडपत्र – 3 तक्रारीसोबत जोडावयाची कागदपत्रे

1) संबंधित दंडाधिकाऱ्यांचे नावे जोडलेले पत्र ज्यामध्ये त्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या कलमांसह वाचलेले भारतीय दंड संहितेच्या 1973 च्या कलम 200 अन्वये, तक्रार पटावर घेण्यासाठी विनंती करणे.
2) घटनेची समयबध्द क्रमवार माहिती देवून त्यात संबंधित कलमांचे उल्लंघन झाले असल्याचे नमुद करावे; तसेच कलम 51 खाली आरोपीला शिक्षा करण्याची विनंती करणे.
3) प्राथमिक गुन्हा अहवाल (POR) / एफ.आय.आर. (FIR) (जर असल्यास) माहितीसोबत न्यायालयाला सादर करणे.
4) आरोपींची यादी
5) साक्षीदारांची यादी
6) गुन्हास्थळाचा मेमो
7) अटक मेमो (गिरफ्तारी प्रपत्र)
8) वैद्यकिय अहवाल
9) नातेवाईकांना कळविल्याचे पत्र
10) जप्तीचा मेमो (जप्तीचे प्रपत्र)
11) आरोपीचे बयान
12) साक्षीदाराचे बयान (वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 च्या कलम 50(8) प्रमाणे)
13) संरक्षित वन / राष्ट्रीय उद्यान / अभयारण्य इत्यादींची राजपत्रातील अधिसूचनेची प्रत.
14) मरणोत्तर शव तपासणी अहवाल / विशेषज्ञांचे मत.
15) वन्यजीव गणना अहवाल (असल्यास)
16) तपास अधिकाऱ्याला नियुक्त केल्याचे पत्र
17) कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेचा (पोस्टींग) आदेश
18) वाहनांची दैनिक नोंदणी वही. (लॉगबुक) (वापरले असल्यास)
19) ज्याचा घटनेशी संबंध आहे असे कोणतेही कागदपत्रे

————————

सहपत्र – 4
व्यक्तीगत रुपरेखा
(Personal Profile)

1. नाव, दुसरी नावे, वडिलांचे नांव :
2. पत्ता :
3. व्यक्तीगत वर्णन :

   जन्मतारीख / वय : केस :

   जन्माचे ठिकाण : डोळे :

   उंची : लिंग :

   वजन : वर्ण :

   शरिराची ठेवण : भाषा :

   नागरीकत्व :

   व्रण / ओळख दाखविणाऱ्या खुणा :

   शेरा :
4. महत्त्वाची व्यक्तीगत माहिती :

   अ) दुरध्वनी / भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :

   ब) इ–मेल पत्ता :

   क) पासपोर्ट क्रमांक :

   ड) बँक खाते क्रमांक :

   इ) आधार कार्ड क्रमांक :

   फ) निवडणुक ओळखपत्र क्रमांक :

   ग) रेशनकार्ड क्रमांक :

   ह) बोटांच्या ठशाचे रेकॉर्ड्स (वृत्तांत) :
5. सध्याचा / पुर्वीचा व्यवसाय आणि स्थावर इस्टेटीची मालकी यादी :
6. सहकारी, साथीदार / नातेवाईक / कुटुंबिय मंडळी व त्यांचे व्यवसाय :



7. गुन्ह्यांचा इतिहास आणि त्याच्याविरुद्ध असलेली वन्यप्राणि गुन्ह्यांची प्रकरणे इत्यादीची थोडक्यात माहिती :
8. गुन्हा करण्याची पद्धत :
9. सध्याच्या कार्यवाहीचे क्षेत्र / त्याचे नेहमीचे कार्यस्थळ :
10. पुर्वी गुन्ह्यातून निर्दोष सुटल्याची / गुन्ह्यात शिक्षा झाल्याची प्रकरणे :
11. बेपत्ता म्हणून घोषित झाला आहे काय? त्याचा तपशील :
12. इतर माहिती व शेरा.

जोडपत्र – 05

वाघाच्या मृत्यू / जप्ती बाबतच्या प्रत्येक प्रकरणात मुख्य वन्यजीव रक्षक आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांना सादर करावयाची माहिती

(To be submitted for each case of tiger mortality / seizure to CWLW and NTCA)

1	कार्यालयाचे नाव	
2	वाघाच्या मृत्यूस्थळाचे वर्णन : वर्णन, अक्षांश–रेखांश, कक्ष / नियतक्षेत्र / वनपरिक्षेत्र / उपविभाग / वनविभाग / व्याघ्र प्रकल्प, किंवा ठिकाण / वेळ	
3	मृत्यूच्या / शवाच्या अहवालाची दिनांक	
4	जप्त केलेल्या शवाची किंवा शारिरीक अवयवांची स्थिती दर्शविणरी माहिती	
5	घटनेची प्रथम माहिती देणाऱ्या व्यक्तिची (कर्मचारी / इतर) माहिती : नाव / पत्ता / संपर्क तपशील / दुरध्वनी क्रमांक / ई–मेल	
6	शव / कलेवराबाबत : दिनांक, वेळ आणि शवविच्छेदन ठिकाण	
7	शवविच्छेदन पथकाची माहिती : (नावे / हुद्दा / पत्ता / संपर्क)	
8	हरवलेल्या शरिराच्या अवयवांची सविस्तर माहिती, असल्यास	
9	शवविच्छेदन अहवालात निष्पन्न झाल्यानुसार मृत्यूचे कारण (शवविच्छेदन अहवालाची प्रत सहपत्रित)	

10	कलेवराचे रंगीत छायाचित्र (जवळुन घेतलेले, जखम दाखविणारे असल्यास)	
11	अ) व्हिसेरा (viscera), नमुना गोळा केल्याची दिनांक आणि न्याय सहाय्यक विश्लेषणाकरिता (Forensic analysis) पाठविल्याची दिनांक ब) न्याय सहाय्यक प्रयोगशाळेचे नाव / पत्ता / संपर्क तपशील क) व्हिसेरा विश्लेषण अहवालाची निष्पत्ती (प्रत जोडावी)	
12	मृत्यूचे कारण : नैसर्गिक / अवैध शिकार	
13	अवैध शिकार / जप्त केलेल्या शारिरीक अवयव प्रकरणात : I. करण्यात आलेली / प्रस्तावित कार्यवाही II. जप्ती करण्यात आलेल्या शारिरीक अवयवाची रंगीत छायाचित्र. III. प्रजाती ओळखल्याचे प्रमाणपत्र जोडावे (हाडाचे तुकडे मांस / इतर शारिरीक अवयव ओळखण्यास अवघड असतील) IV. गुन्हेगार / संशयीत (अटक केल्यास) त्याबाबत केलेली कार्यवाही V. प्रकरणाची / तक्रारीची स्थिती : नंबर, तक्रार दाखल केल्याची दिनांक, अधिनियमानुसार कलमांचा उल्लेख, दाखल केलेल्या न्यायालयाचे नाव	
14	नैसर्गिक मृत्यूचे कारण : (निष्कर्षाच्या आधारासहित)	
15	शेरा (जर असेल)	
16	प्राधिकृत अधिकाऱ्याचे हस्ताक्षर, नाव, हुद्दा, दिनांक आणि मोहरसहित (Stamp)	


(ही कार्य पध्दती डब्लु. सी. सी. बी., श्री सौरभ शर्मा, कायदेविषयक तज्ञ आणि व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रिय अधिकारी यांच्या सल्ल्याने बनविली)






भाग – 8

वाघ व बिबट : आपणास हे माहित हवं!





वाघ व बिबट : आपणास हे माहीत असायला हवे!

मार्जार कुळाची (Felidae) ओळख :

वाघ व बिबट हे मांसाहारी (Carnivore) गटाच्या (Order) फेलीडी कुंटुबात (Family) मध्ये येतात. सर्वच उष्णकटीबंधीय देशामध्ये मांसाहारी गटातील प्रजातींची संख्या जास्त आहे. मांसाहारी प्राणी हे अन्न साखळीत सर्वोच्च स्थानी असल्यामुळे परिस्थितीकीमध्ये आवश्यक असणारे संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. जगामध्ये मांसाहारी प्राण्यांच्या 286 प्रजाती आहेत, त्यापैकी भारतात 55 प्रजाती आढळतात. तर मार्जार कुळातील प्राण्यांच्या जगात 40 प्रजाती असुन, त्यापैकी 16 प्रजातींची नोंद भारतात झाली आहे. मार्जार कुळातील सर्व सदस्यांना मांजर (Cats) म्हणून ओळखले जाते. मार्जार कुळात येणाऱ्या सदस्यांपैकी भारतात आढळणाऱ्या प्रजाती पुढील प्रमाणे– सिंह, वाघ, बिबट, हिमालयीन बिबट (Snow Leopard), ढगळया बिबटया (Clouded Leopard), सॅन्ड कॅट, डेझर्ट कॅट, जंगल कॅट, कॅराकल, लिंक्स (Lynx),पालास कॅट किंवा मनुल (Palla's Cat), रस्टी स्पॉटेडकॅट, लेपर्ड कॅट, फिशिंग कॅट, ॲशिएिटिक गोल्डन कॅट, मार्बल कॅट इत्यादी याच गटातील एक सदस्य असलेला आशियाई चित्ता भारतातून संपूर्ण नष्ट झाला.

आज वन्यजीवांच्या अधिवासांचा ऱ्हास होत चालल्यामुळे या प्राण्यांपुढे मुक्तपणे वावरण्यासाठी अपुरी पडत चाललेली जागा आणि अन्नाची कमतरता यामुळे मानव–वन्यप्राणी संघर्ष वाढत चालला आहे. यामध्ये प्रामुख्याने वाघ व बिबट हया प्राण्यांना सामोरे जावे लागते. मानव– वन्यप्राणी संघर्षाचा प्रसंग उद्‌भवल्यास कशाप्रकारे कृती करावयाची याबाबत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA), नवी



दिल्ली यांनी वेळोवेळी दिलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे प्रमाणभूत कार्यपध्दतींचा समावेश या पुस्तकात आहे. परंतु, मानव – प्राणी संघर्षाच्या, विशेषतः वाघ व बिबट, घटना हाताळतांना त्या प्राण्याविषयी, त्याच्या स्वभावाविषयी संबंधीत चमु, अधिकारी, वन्यजीव प्रेमी इत्यादिंना मूलभूत शास्त्रीय माहिती असणे जरूरी आहे. सदर माहिती या ठिकाणी दिली असुन, ती मानव – वन्यप्राणी संघर्षाच्या घटना यशस्वीपणे व आत्मविश्वासाने हाताळण्यास अत्यंत उपयोगी राहील.

वाघ *(Panthera Tigris)*
(Schedule - I)

मार्जार कुळातील पॅथेरा (Panthera) सदस्य हे 05 दशलक्ष वर्षे पुर्वी उत्क्रांत झाले असे मानतात. सिंह, बिबट व जग्वार या प्राण्यांपुर्वीच वाघ हा पॅथेरा वंशावळीपासुन दोन दशलक्ष वर्षापुर्वी वेगळा झाला. वाघ भारतीय उपखंडात उत्तरेकडुन 1 दक्षलक्ष वर्षापूर्वी आला असे मानले जाते. वाघ हा आपला राष्ट्रीय प्राणी आहे.

1. वर्गीकरण (Classification) :–

ऑर्डर – कार्नीव्होरा (मांसाहारी)
फॅमिली – फेलिडी (मार्जार कुळ)
सब – फॅमिली– पॅन्थेरिनी
जीनस – पॅन्थेरा
स्पेसिज – टायग्रीस



2. अधिवास (Habitat) :–

- सर्व प्रकारच्या जंगलामध्ये वाघाचा वावर आहे. पश्चिम घाटाची सदाहरित – निमसदाहरित जंगले, मध्य भारतातील उष्ण कटीबंधीय पानझडी जंगले, राजस्थानची शुष्क जंगले ते सुंदरबनची खारफुटीच्या जंगलापर्यंत वाघ आपले अस्तित्व टिकवून आहे.

- वाघ हा 48°से. ते 0° से. पर्यंत (रशियात – 35° से.) सहन करू शकतो. तसेच समुद्र सपाटीपासून 0 ते 3000 मी. उंचीपर्यंत (कधी कधी 4700 मी.) आढळतो.
- आज वाघाच्या शिल्लक राहिलेला अधिवास (35 ते 40 हजार चौ.कि.मी.) हा त्याच्या इतिहासातील एकेकाळच्या अधिवासाच्या एक टक्काच शिल्लक आहे.

3. वर्णन (Description) :—

- पिवळसर शरीरावर काळे पट्टे असतात. पोटाकडे पांढरा रंगावर काळे पट्टे असतात. कानाच्या मागची बाजू संपूर्ण काळी असुन मध्येच पांढरे शुभ्र व मोठया आकाराचे ठिपके असतात. प्रत्येक वाघाच्या शरीरावरील पट्टयांची रचना वेगवेगळी असते, जसे की, प्रत्येक माणसाच्या अंगठयाचे निशाण वेगवेगळे असते. त्यामुळे कॅमेरा ट्रॅप पध्दतीने वाघांची संख्या





ठरविताना वाघाच्या शरीरावरील पट्टयांची रचना पाहून प्रत्येक वाघ वेगवेगळा ओळखता येतो.



• तो शिकार करतेवेळी गवतातून लपतछपत, दबकत जाऊन (Stalking), दबा धरून अचानक सावजावर हल्ला (Ambush) करतो यामध्ये वाघास



त्याच्या शरीरांवरची रंगसंगती, आजुबाजुच्या परिस्थितीशी बेमालूम मिसळून घेण्यास मदत करते व सावजास वाघाचे अस्तित्व लक्षात येत नाही.

4. शारीरीक वर्णन (Physical Description) :–

अ) वजन– नर – 175 ते 260 कि.ग्रॅ.
मादी –100 ते 160 कि.ग्रॅ.

ब) लांबी – नर – 270 ते 310 से.मी. (शेपटीसह)
मादी – 240 ते 264 से.मी. (शेपटीसह)
(टिप :– शेपटीची लांबी – 85 ते 110 सेमी)

क) उंची – 90 ते 110 से.मी.

ड) वय (वर्षे)– नैसर्गिक अधिवासात – 12 ते 16 वर्षे
प्राणीसंग्रहालयात – 20 वर्ष

इ)दांताची संख्या –एकुण दात तीस ((i) वरचे पुढचे दाते (Upper Incisor) = 06, खालचे पुढचे दात (Lower Incisors) = 06, वरचे सुळे (Upper Canines) = 02, खालचे सुळे (Lower Canines) = 02, वरची दाढ (Premolar) = 06, खालची दाढ (Premolar) = 04 आणि वरची दाढ (Molar) = 02 व खालची दाढ (Molar) = 02.)



(ii) वाघाचे वरचे सुळेदात 50 – 60 मिमी लांबीचे तर खालच्या जबडयातील सुळेदात 40 – 50 मिमी लांबीचे असतात.

(iii) सुळे दातांबरोबरच पुढचे दोन्ही भक्ष्यावर झडप घातल्यानंतर त्याला घट्ट पकडुन ठेवायला उपयोगी पडतात.

(iv) वरच्या खालच्या जबडयांतील दाढा एकामेकांत करवतीच्या दात्याप्रमाणे घट्ट बसतील अशाप्रकारे रचना असते. त्यामुळे त्यांचा जबडा आपल्या प्रमाणे पुढेमागे हलु शकत नाही, तर तो वर खाली असाच हलतो.

ई) पंजा (Paw) –• वाघाच्या पुढच्या पायांच्या पंजास प्रत्येकी 05 बोटे व मागच्या पायांच्या पंजास, प्रत्येकी 04 बोटे अशी एकूण 18 बोटे व त्यास प्रत्येकी एक नख अशी एकूण 18 नखे असतात.





• पुढच्या पायांचे पाचवे बोट, थोडे वर असल्यामुळे जमिनीवर चालताना उमटत नाही. (फक्त 16 बोटेच उमटतात)

• प्रत्येक बोटांस एक नखी (Claw) असते व ती आत घेणे व बाहेर काढण्याची (Retractile Claws) सोय असते. ही सोन कुत्र्यांच्या गटांतील (Canidae) प्राण्यांमध्ये नसते. या नख्या चालतांना आत ओढून घेतल्याने जमिनीवर ठशांमध्ये उमटत नाहीत. कुत्र्यांच्या गटातील (Canidae) रानकुत्रा, कोल्हा, लांडगा इत्यादि यांच्या ठशांमध्ये उमटतात.



•वाघ शिकारीच्या वेळी नख्या बाहेर काढतो.
•वाघाचा पंजा गादीचा असल्यामुळे चालतांना पावलांचा आवाज होत नाही.

फ)ज्ञानेंद्रिये (Senses)—• डोळे गोल, मोठे व चेहऱ्यांवर समोर असल्यामुळे कमी प्रकाशातही सावजाचे अंतर व हालचाल ओळखण्यास मदत होते. पंरतु त्यास रंगातील फरक जास्त ओळखता येत नाही.



• बारीकसाही आवाज ओळखण्यात कान खूप तीक्ष्ण असतात.

• सावज शोधण्यास घाणेद्रिंयांचा (Smell) जास्त उपयोग होत नाही.



• इतर मार्जार प्रजातीप्रमाणे वाघांसही चेहऱ्यावर (Cheeks), बोटांजवळ, शेपटीशी व गुदद्वाराजवळ विशिष्ट वासाच्या / गंधाच्या ग्रंथी (Scent Gland) असतात. हयाचा उपयोग वाघास इतर वाघ / वाघीणीस विशिष्ट संदेश देण्याकरिता होतो.

ग) प्रजननः ठराविक नाही, वर्षभर कधीही(प्रामुख्याने – पावसाळयानंतर)

ह) गर्भवहन कालावधी –102 ते 108 दिवस

ई) पिल्लांना जन्म (Litter Size) –एका वेळी 02 ते 05 पिल्ले (सर्व साधरणपणे 03 पिल्ले)



ज)वयात येण्याचे वय –03 ते 04 वर्षे

5. खाद्य (Food) :

- वाघ हा बेडुक, मासे पासुन ते गौर पर्यंत वेगवेगळे प्राणी खातो. प्रामुख्याने सांबर, चितळ, रानडुक्कर, निलगाय, पाळीव जनावरे, भेकर, चौशिंगा, गौर इत्यादी. एक टनाच्या गौरला म्हणजेच त्याच्या वजनाच्या पाच पट वजनाच्या गौरला (Indian Gour) मारल्याच्या नोंदी आहेत. तसेच अस्वल, बिबट आणि रानकुत्री यांनाही मारल्या व खाल्याच्या नोंदी आहेत. कधी कधी वेळ पडल्यास शिळे, कुजकेमांस सुध्दा खातो.
- शिकारीसाठी केलेल्या एकूण प्रयत्नापैकी फक्त पाच टक्के प्रयत्नात वाघास सावज पकडण्यात यश मिळते असे तज्ञाचे मत आहे.
- वाघ मोठया सावजास गळयास जबरदस्त चावा घेऊन तर डुक्कर व चितळास मानेस चावा घेऊन ठार करते. या प्रयत्नात मज्जातंतू (Spinal Cord) व कण्याचा मानेतील भाग तुटून सावज (Prey) मरते.
- वाघ हा शिकारीच्या शोधात व आपल्या क्षेत्राचे (Territory) संरक्षण करण्याकरिता दिवासतून 06 ते 08 तास फिरत असतो. अभ्यासावरून असे दिसुन आले आहे की, वाघाच्या फिरण्याच्या काळापैकी 80 टक्के वेळ रात्री व 20 टक्के वेळ दिवसा फिरण्यात घालवतो. हे प्रमाण विविध भागात वेगळे असु शकते. प्रामुख्याने सकाळ व संध्याकाळ जास्त क्रियाशील असतो.



- हाडांना चिकटून उरले सुरले मांस निपटून काढण्यासाठी वाघास (इतर मार्जार सदस्यांनाही) त्यांच्या खरखरीत जीभेचा उपयोग होतो.



जीभेचा चव कळण्याकरिता जास्त उपयोग होत नाही. त्यांच्या जीभेवरील चव कळणाऱ्या ग्रंथी फारच लहान असुन त्या कडेने बसविलेल्या असतात.

- वाघाची पाणवठयाच्या ठिकाणी शिकार करण्यास जास्त पसंती असते. कारण वाघास शिकार मिळण्याची शक्यता, शिकार केल्यानंतर पिण्यासाठी व बसण्यासाठी पाण्याची गरज असते.
- वाघ सावज मारल्यानंतर इतर मांसाहारी प्राण्यापासून वाचविण्या साठी शिकार (Kill) ओढत नेऊन लपवून ठेवतो.



- वाघ शिकार केल्यानंतर त्या भागात 01 ते 07 दिवसांपर्यत राहतो व त्याकाळात किमान शिकार झालेल्या प्राण्याच्या वजनाच्या दोन तृतीयांश भाग खाऊन संपवतो. एकावेळी 20 – 35 किलो पर्यंत मांस खातो.
- वाघ हा शिकारीस प्रामुख्याने पार्श्वभाग / पुठ्ठा (Rump) पासून खाण्यास सुरूवात करतो.
- वाघ एका वर्षात जवळजवळ 4000 किलो वजनाची सावज / शिकार खातो, तर वाघीण 3000 किलो पर्यंत खाते. प्राणी संग्रहालयातील वाघास एका वर्षात 1700 ते 2100 किलोपर्यंत

मांस लागते.

- एका वाघास वर्षाकाठी 50 प्राण्यांची शिकार करावी लागते आणि शाश्वत पध्दतीने प्रत्येक वर्षी 50 (एकुण संख्येच्या 10 टक्के) प्राणी जन्मण्यासाठी किमान 500 प्रौढ प्राण्याची संख्या जंगलात असावी लागते असे अभ्यासावरून सिध्द झाले आहे.
- पिल्ले असलेल्या वाघिणीस वर्षाकाठी 60 ते 75 सावज (हरणे) लागतात.

6. वागणुक व सामाजिक जीवन (Social Life) :


- वाघ हा एकटा राहणारा प्राणी आहे. फक्त वाघिणीबरोबर 2 ते 2.5 वर्षापर्यंत पिल्ले असतात.
- प्रत्येक वाघाच्या स्वतःचा प्रदेश (Territory) ठरलेली असते.
- प्रत्येक वाघ आपले अस्तित्व व प्रदेश दुसऱ्या वाघास



समजण्यासाठी वेगवेगळया प्रकारे खुणा करतात. त्यामध्ये झाडावर नख्यांनी ओरखडे (Clawing / Rake Mark), मूत्र सोडणे (Urin Spray), गुदद्वाराच्या ग्रंथीतुन गंधखुणा सोडणे, (Scent Deposition), गवतात लोळुन खुणा करणे (Rolling), जमिनीवर पाय, नखांनी घासुन खुणा करणे (Scraping), जागोजागी मलमूत्र (Scat) टाकुन खुणा करणे. या



पध्दतीतून दुसऱ्या स्वजातीतील इतर प्राण्यांशी संपर्क व संबंध ठेवतात.



- वाघ हा इतर मांसाहारी प्राण्यात सर्वात प्रबळ (Dominant) प्राणी मानला जातो.
- जास्त सावज प्राण्याची (Prey) घनता असलेल्या क्षेत्रात एका वाघांचे प्रदेश (Territory) 10 – 20 चौ. कि.मी. तर सावज प्राण्यांची घनता कमी असलेल्या प्रदेशात ती 240 चौ. कि.मी. पर्यंत असू शकतो. साधारणपणे वाघाचा प्रदेश (Territory) – 40 ते 100 चौ. कि.मी. तर वाघिणीचा प्रदेश (Territory) 13 ते 30 चौ. कि.मी. असते.
- एका वाघ नराच्या प्रदेशात (Territory) एक पेक्षा जास्त वाघिणीचा प्रदेश (Territory) अंतर्भूत असू शकतो.
- वाघ व वाघिणीचे मिलन 2 ते 7 दिवस चालते, या काळात



त्यांचे 100 पेक्षा जास्त वेळा मिलन होते. एकावेळी 15

सेकंदापेक्षा कमी मिलन होते.

7. वाघीण व पिल्ले (Tigress & Cubs) :

- गर्भधारणेच्या 102 ते 108 दिवसानंतर वाघिण गुहेत किंवा अशाच अडचणीच्या भागात 02 ते 05 (प्रामुख्याने 03) पिल्लांना जन्म देते.
- पिल्ले जन्मतःच आंधळी असतात. पहिले 15 दिवस पिल्ल्यांचे डोळे बंद असतात.
- पिल्ले पहिले दोन महिने फक्त दुधांवर जगतात.
- वाघीण या काळात खुप आक्रमकपणे पिल्लांचे संरक्षण करते. असुरक्षित वाटल्यास पिल्लांना तोंडात धरून दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी हलविते.
- पिल्ले 02 ते 03 महिन्याची झाल्यानंतर शिकारीवर नेते. तर 12 महिन्यानंतर पूर्ण प्रदेशात स्वतः बरोबर घेऊन फिरते 12 ते 18 महिन्यात कायमस्वरूपी (Permanent) दात येतात व ते शिकारीत निपुण होतात.
- कधी कधी एका वाघाने, दुसऱ्या वाघाचा प्रदेश (Territory) त्याला हाकलुन स्वतःकडे घेतला, तर जुन्या वाघापासून झालेल्या त्या प्रदेशात असलेल्या वाघिणीच्या पिल्लांना मारून टाकण्याची सवय (Infanticidal behavior) काहीवेळा दिसुन आलेली आहे..

8. प्रजनन क्षमता (Reproduction) :

- वाघीण 3 ते 4 वर्षात वयात येते. साधरणतः 20 ते 30 दिवसांची ''इस्ट्रस सायकल'' "Estrus cycle" असते व प्रत्येक वेळी 3 – 7 दिवस 'हिट' (Heat) वर राहते.
- साधारणतः 03 पिल्ले होतात व पिल्लांमध्ये नर – मादीचे प्रमाण सारखे असते.
- वाघीण एका विणीतील पिल्लांना जन्म दिल्यानंतर त्यांना



वाढवून दुसऱ्या पिल्लांना जन्म देण्याचा कालावधी सरासरी 2 ते 2.5 वर्षे असतो.

- अभ्यासावरून असे दिसुन आले आहे कि, एकुण जन्मलेल्या पिल्लांपैकी 23 ते 25 टक्के पिल्ले विविध कारणानी मरतात व 75 ते 77 टक्के पिल्लेच जगतात.
- मादी तिच्या आयुष्यातील 07 ते 08 वर्षाच्या उत्पादनक्षम काळात 03 ते 04 वेळा पिल्ले (Litters) देते. तर नराच्या उत्पादनक्षम काळ हा 2 ते 4 वर्षाचाच असतो.



- ज्या क्षेत्रात वाघीणी पिल्लांना जन्म देतात व वाढवतात त्यास स्त्रोत (Source) क्षेत्र उदा. व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये इत्यादी तर ज्याठिकाणी स्त्रोत (Source) क्षेत्रातील वाघांच्या संख्येत वाढ झाल्याने अतिरिक्त संख्येतील वाघ नव्या प्रदेशाच्या (Territory) शोधात बाहेर (Transient) पडून नविन क्षेत्रात आपला प्रदेश (Territory) स्थापित करतात, त्या सिंक क्षेत्र (Sink) म्हणतात.
- वाघाचे वावर क्षेत्र अलिकडच्या काही शतकांमध्ये 93 टक्कयाने कमी झाल्यामुळे वाघाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. वाघांचे अस्तित्व जंगलाची तोड, वाघाची कातडी व हाडांसाठी होणारी शिकारी, वाघाच्या सावज (Prey) प्राण्यांची मोठया प्रमाणात होणारी शिकार, वाघांचे अस्तित्व असलेल्या दोन मोठया जंगलामधील क्षेत्रात तुटत चाललेले कॉरीडोर,

जंगलावर मानवी गरजांसाठी वाढत चाललेला दबाव हि कारणे वाघांचे अस्तित्व आणि भविष्य धूसर करण्यास जबाबदार ठरत आहेत.

बिबट *(Panthera Pardus)*
(Schedule - I)

1. प्रस्तावना :

बिबट हा सस्तन प्राण्यापैकी अतिशय चपळ, चतुर व सुंदर प्राणी आहे. जगामध्ये बिबटयाच्या 27 उपजाती असल्याचे मानतात. त्यापैकी आफ्रिकेत 13 तर आशियामध्ये 14 उपजाती आहेत. परंतु अलीकडच्या काळात झालेल्या जनुकीय अभ्यासानुसार बिबटयाच्या आठच उपजाती आहेत.

बिबटयांचा जन्म हा दमट व थंड हवामान प्रदेशात होऊन कालांतराने ते उष्ण हवामान प्रदेशात पसरल्याचे मानले जाते. दोन दशलक्ष वर्षापूर्वी ''पॅन्थेरा'' जीनस (Genus) मधुन बिबटयाची प्रजाती वेगळी झाल्याचे समजतात. परंतु आधुनिक रेण्वीय जनुकीय अभ्यासामुळे 8.20 ते 4.25 लाख वर्षापूर्वी बिबटे आफ्रिकेत उत्क्रांत झाल्याचे लक्षात आले आहे आणि 3.00 ते 1.70 लक्ष वर्षापूर्वी आशियात पसरले. तेव्हापासुन



आजपर्यंत पृथ्वीवरील बदललेल्या वातावरणाशी बिबटयांनी स्वतःला जुळवून घेतले आहे आणि आपले अस्तित्व टिकविले आहे. आज मात्र त्याच्या अधिवासाचा झालेल्या ऱ्हासामुळे तो मानवा बरोबरच्या संघर्षात अडकलाय. अशा मानव – बिबट संघर्षाशी सामना करताना वन अधिकारी व इतरांना बिबट विषयी खालील इत्यंभूत माहिती असायला हवी.

2. वर्गीकरण (Classification)

ऑर्डर – कार्नीव्होरा (मांसाहारी)
फॅमिली – फेलिडी (मार्जार कुळ)
सब– फॅमिली– पॅन्थेरिनी
जीनस – पॅन्थेरा
स्पेसिज – पारडस



3. अधिवास (Habitat)

- सर्व प्रकारच्या जंगलामध्ये बिबटचे वास्तव्य आहे. फक्त खारफुटीची जंगले व दलदलीच्या भागात राहणे बिबट टाळतो. बिबटने वाघ व सिंह दोहोंच्याही अधिवासात स्वतःला जुळवून घेतले आहे. बिबट जंगलाबरोबरच कॉफीचे मळे, फळबागा, शेतीचे मळे इत्यादी मध्ये सुध्दा अस्तित्व टिकवुन ठेवण्यात यशस्वी झाले आहेत.
- बिबट हा भारतातील जवळजवळ सर्व राज्यातील जंगलात आढळतो.
- बिबट हा 48^{0}से. ते 0^{0} से. पर्यंत (कलहारी वाळवंटात 70^{0} से. ते रशियात – 35^{0} से.) इतक्या मोठया तापमान कक्षेत तग धरून राहतात.
- तसेच, समुद्र सपाटीपासुन ते 3000 मी. उंचीपर्यंत त्याचे

वास्तव्य आहे.

4. वर्णन :

- बिबट हा वजनाने वाघाच्या एक चतुर्थांसच असतो.
- बिबटचे शरीर सडपातळ असुन, शेपटी लांब असते. शरीर पिवळसर, नारंगी असुन त्यावर फुलांच्या (Rosettes) आकाराचे काळे व पोकळ ठिपके असतात.
- प्रत्येक बिबटयाच्या शरीरावरील ठिपक्यांची रचना / आकृतीबंध हा वेगवेगळा असतो. कॅमेरा ट्रॅपींगमध्ये मिळालेल्या फोटोमधून ठिपकांच्या रचनेचा अभ्यास करून वेगवेगळे बिबट ओळखून बिबटयांची किमान संख्या काढू शकतो.



- बिबटयाचा चेहरा, खांदे व पायाचा खालचा भाग यावर वेगवेगळया आकाराचे काळे व भरीव (Solid) ठिपके असतात.
- कधी कधी जनुकीय घटकांतील बदलामुळे व मेलॅनीन द्रव्याच्या जास्त प्रमाणामुळे 'काळे किंवा मेलॅनिस्टिक' (Black Panther) बिबटेही आढळतात. ते नेहमीच्या बिबटयापेक्षा वेगळे दिसत असले तरी, काळे बिबटे ही बिबटयाची वेगळी प्रजाती नव्हे.
- बिबटे हे अत्यंत चपळ असतात व बराचशा वेळ झाडावर (arboreal) घालवतात. त्यासाठी त्यांना सडपातळ शरीराची व लांबशेपटीची मदत होते. त्यांच्या शरीरातील हाडे हलकी, हाडांचे सांधे लवचिक व स्नायू मजबूत असल्यामुळे बिबटया चपळपणे हालचाली करतो.



5. शारीरीक वर्णन (Physical Description)

अ) वजन – नर – 45 ते 77 कि.ग्रॅ.
मादी – 30 ते 45 कि.ग्रॅ.

ब) लांबी – नर – 203 ते 243 से.मी. (शेपटीसह)
मादी – 180 ते 208 से.मी. (शेपटीसह)
(टिप :– शेपटीची लांबी – 76 ते 106 सेमी)

क) उंची – 50 ते 75 से.मी. (खांद्यापर्यंत)

ड) वय (वर्षे)– नैसर्गिक अधिवासात
–12 ते 16 वर्षे

इ)दांताची संख्या – एकुण दात तीस (**(i)** वरचे पुढचे दात (Upper Incisors) = 06, खालचे पुढचे दात (Lower Incisors) = 06, वरचे सुळे (Upper Canines) = 02, खालचे सुळे (Lower Canines) = 02, वरची दाढ (Premolar) = 06, खालची दाढ (Premolar) = 04 आणि वरची दाढ (Molar) = 02 व खालची दाढ (Molar) = 02.)**(ii)** बिबटयाचे वरचे सुळेदात 29 – 40 मिमी लांबीचे तर खालच्या जबडयातील सुळेदात 20 – 30 मिमी लांबीचे असतात.

ई) पंजा (Paw) :–

- वाघाप्रमाणे बिबटयाच्या पंज्यास दोन्ही मिळुन 18 बोटे (Toes) असतात.
- बिबटयाच्या पुढच्या पायांच्या पंजास प्रत्येकी 05 बोटे व मागच्या पायांच्या पंजास, प्रत्येकी 04 बोटे अशी एकुण 18 बोटे व 18 नखे असतात.
- पुढच्या पायांचे पाचवे बोट, थोडे वर असल्यामुळे जमिनीवर चालताना उमटत नाही. (फक्त 16 बोटेच उमटतात)

- प्रत्येक बोटांस एक नखी (Claw) असते व ती आत घेणे व बाहेर काढण्याची (Retractile Claws) सोय असते या नख्या चालतांना आत ओढून घेतल्याने जमिनीवर ठशांमध्ये उमटत नाहीत.
- बिबट शिकारीच्या वेळी नख्या बाहेर काढतो.
- बिबटयाच्या पंज्याचा आकार (3 – 4 इंच) हा वाघापेक्षा लहान (5 – 6 इंच) असतो.

फ) ज्ञानेंद्रिये :–

- डोळे गोल, मोठे व चेहऱ्यावर समोर असल्यामुळे कमी प्रकाशात हालचाल व अंतर ओळखण्यास मदत होते.
- कान अतिशय तीक्ष्ण असतात.
- इतर मार्जार सदस्यांप्रमाणे बिबटयासही चेहऱ्यावर, बोटांमध्ये शेपटीजवळ व गुदद्वार भागात गंधाच्या ग्रंथी असतात.
- आपल्या अस्तित्वाचा आणि प्रदेशाचा (Territory) प्रचार करण्यास बिबटयास या ग्रंथीतील 'गंध खुणांचा' उपयोग होतो.

ग) प्रजनन :– वर्षभर (कधीही)

ह) गर्भवहन कालावधी – 98 ते 105 दिवस

ई) पिल्लांना जन्म (Litter Size)
– 01 ते 03 पिल्ले (सर्वसाधारणपणे 02 पिल्ले)

ज) वयात येण्याचे वय – 03 ते 04 वर्षे

6. खाद्यः

- बिबट हा नेहमी त्याच्या आकाराएवढी अथवा लहान शिकार पकडणे पसंत करतो. उदा. 10 ते 50 किलो पर्यंत आकाराचे सावज (Prey) विशेषतः वानरांची शिकार करण्यास बिबट पटाईत आहेत.



- त्याच्या खाद्यात उंदीर तसे पक्षी साळींदर, चितळ पासुन पाळीव प्राणी शेळया मेंढया व कुत्रीही प्राण्यांचा समावेश





असतो.

- बिबटने केलेल्या शिकारीच्या प्रयत्नापैकी 5 ते 10 टक्के प्रयत्नात तो यशस्वी ठरतो, असे अभ्यासाअंती लक्षात आले आहे.
- बिबटया सावजाच्या गळयास किंवा मानेला मागच्या बाजुस जबरदस्त चावा घेऊन ठार करतो.
- मोठे सावज असल्यास बिबटया मागच्या बाजूने खाण्यास सुरूवात करतो. साधारणपणे तो सावज पोटाकडुन खातो. आतडी वैगेर पोटाचे भाग वाघाप्रमाणे दूर काढून टाकत नाही.
- सावज मारल्यानंतर पहिल्या खाण्यात एकावेळी 08 ते 11 कि. ग्रॅ. मांस खातो.
- शिकार केलेल्या भागात बिबट 2 ते 4 दिवस वावरतो. त्याकाळात 20 ते 35 कि.ग्रॅ. पर्यंत मांस खातो. शिकार केलेल्या प्राण्यांचा दोन – तृतीयांश पर्यंत भाग बिबट खाऊन फस्त करतात.
- बिबट वर्षाला सरासरी 40 कि. ग्रॅ. वजनाने 30 ते 35 प्राण्यांची शिकार करतो. त्यास वर्षभरात 900 किलोपर्यंत मांस मिळण्याकरिता 1300 कि.ग्रॅ. वजनाच्या जीवंत प्राण्याची

शिकार करावी लागते.

- बिबट इतर मांसाहारी प्राण्यांकडुन संरक्षण करणेकरिता आपली शिकार झाडांवरही लपवून ठेवतो.

7. वागणुक व सामाजिक जीवन :

- बिबट हा एकटयाने राहणारा प्राणी आहे.
- वाघाप्रमाणेच बिबटच्या नर व मादींचा स्वतःचा प्रदेश (Territory) असते. त्याचा आकार 30 ते 75 चौ. कि.मी. एका नराचा व 14 ते 20 चौ. कि.मी. इतका एका मादीचा प्रदेश (territory) असतो.
- एका नराच्या प्रदेशामध्ये (Territory) एकापेक्षा जास्त बिबट मादीचा स्वतःचा प्रदेश (Territory) असतो.
- प्रत्येक बिबट आपल्या प्रदेशाचे (Territory) चे संरक्षण करतो व गंधखुणांनी (Urine Spray, Scat Deposition) तसेच जमीनवर खुणा (Scrape marks) करून त्यांच्या प्रदेशांची हद्द ठरवितात.

8. मादी व पिल्ले :

- मादी मिलनानंतर 98 ते 105 दिवसांनी पिल्लांना सुरक्षित




ठिकाणी जन्म देते.

- जन्मतःच पिल्ले आंधळी असतात. आठव्या दिवसानंतर पिल्लांचे डोळे उघडतात.
- पहिल्या 100 दिवसापर्यंत पिल्ले फक्त दुधच पितात.



- पिल्ले 3 – 4 महिन्यात आई बरोबर शिकार खाण्यास बाहेर पडतात.
- बिबटची पिल्ले 12 महिन्यानंतर शिकारीत पटाईत होतात, तर 15 ते 24 महिन्यांनी आईस सोडून जातात.
- मादीचा पुनरूत्पादनक्षम काळ हा 6 ते 7 वर्षाचा असतो, तर नराचा मादीच्या अर्धा असतो.
- मादीची 20 ते 50 दिवसांची ''इस्ट्रस सायकल'' "Estrus cycle" असते, तर पहिली पिल्ले पूर्ण वाढून झाल्यानंतर दुसऱ्यांदा पिल्ले देण्यास तयार होण्याचा कालावधी 18 ते 24 महिन्याचा असतो.
- मादी तिच्या आयुष्यात 6 ते 8 पिल्लांना जन्म देते. बिबट हा अतिशय चतुर व चपळ प्राणी असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तो स्वतःला जुळवुन घेऊ शकतो. बिबटयाच्या जंगलाचा होत असलेला ऱ्हास, वन्य सावजांची कमी घनता, उर्वरित जंगलावरील वाढत चाललेला मानवी दबाव असे प्रश्न असुनही बिबट स्वतःच अस्तित्व टिकवून ठेवण्यात अजुन तरी यशस्वी राहिला आहे.

मांसभक्षी प्राण्यांची विष्ठा ओळखणे

वन्यप्राण्याने अन्न खाल्यानंतर त्याचे पचन होऊन विष्ठा टाकली जाते. या विष्ठेवरून प्राण्यांची ओळख, त्याचे खाद्य काय, तो प्राणी कोणत्या अधिवासात राहतो याची माहिती मिळवता येते. वन्यप्राणी खाणाखुणांमध्ये विष्ठा ही महत्वाची आहे. प्राण्यांच्या गणनेसाठी, विष्ठेचा आधार घेतला आहे. मांसभक्षी प्राण्यांची विष्ठा स्कॅट (Scat) म्हणून ओळखली जाते.

तृणभक्षी प्राण्याची लेंडी – पेलेट (Pellet) व शेण म्हणून ओळखली जाते. शाकाहारी प्राण्याची लेंडी छोटी, गोल व काळसर करडया रंगाची असते. मांसाहारी प्राण्याची विष्ठा

लांबुळकी व एका बाजूने निमुळती झालेली असते. खासकरून मांसभक्षी प्राण्यांच्या विष्ठेवरून त्या प्राण्याने कोणत्या प्राण्याची शिकार केली हे ओळखण्यास मदत होते.

मांसभक्षी प्राण्यांची विष्ठा लांबूळकी असते. त्यात खाल्लेल्या प्राण्यांचे केस, हाडे दिसतात.

रानकुत्रा - रानकुत्र्याची समुहाने विष्ठा टाकण्याची सवय असते. रस्त्याच्या मधोमध त्यांची विष्ठा, मुत्र बघायला मिळते. एका रानकुत्र्याने विष्ठा टाकल्यावर दुसरा कुत्राही तेथेच कार्यभार उरकतो.

बिबट - बिबट्याची विष्ठा लांबूळकी, वाघाच्या तुलनेत आकाराने लहान असते. पायवाटेच्या कडेला, गवतात ती बघायला मिळते. प्राण्याचे केस, हाडे बघायला मिळतात.

कोल्हा / खोकड / तरस : या प्राण्याची विष्ठा आकाराने लहान, लांबूळक्या व करड्या - भुरकट रंगाच्या असतात. या विष्ठा रस्त्याच्या कडेला बांधावर बघायला मिळतात. तरसाची जूनी विष्ठा पांढरी असते. हाडं खाल्यामुळे ती तशी दिसते.

वाघ - वाघाची विष्ठा आकाराने मोठी व लांबुळकी असते. यात केस, हांड ठळकपणे बघायला मिळतात. रस्त्याच्या, पायवाटेच्या कडेला ती दिसते.

मांसभक्षी प्राण्यांच्या खाण्याच्या सवयी

१. जंगलात तृणभक्षी प्राण्यांच्या शिकारीवरून, त्या प्राण्याला कोणी मारून खाल्ले याचा अंदाज बांधता येतो. हे काम अनुभवातून तसेच त्या परिसरात कोणत्या प्राण्यांचा वावर आहे यावरून निश्चित करता येते.

२. वाघाने शिकार केली असल्यास, तृणभक्षी प्राण्यांच्या मानेवर, मानेखाली ठळक दातांचे निशाण बघायला मिळतात.

३. वाघ आपल्या शिकारीला मागील बाजूने (पुट्ठ्याकडून) खाण्यास सुरवात करतो. तो प्राण्यांच्या पोटाकडील भाग (आतडी) स्वच्छ करून, बाहेर टाकून मगच खायला सुरूवात करतो.

४. बिबट, पोटाच्या बाजूने खाण्यास सुरवात करतो. लहान तसेच मोठया आतडीला तो खातो. त्याचे खाणे काहीसे अस्वच्छ समजले जाते.

५. रानकुत्री आपली शिकार जीवंत असतानाच त्यांना खाण्यास सुरवात करतात. वेगाने हा प्राणी ते संपवतात. पोटाकडील भाग, छातीकडील भाग, पाय, सर्व



खावून संपवतात.

वाघ व बिबट पंजातील फरक

१. वाघाच्या पंजाची बोटं, गादी (पॅड) च्या तुलनेत मोठी असतात तर – बिबट्याच्या पंजाची बोटं (टो) गादीच्या तुलतेत लहान असतात.

२. वाघाची बोटं फुगीर असतात तर बिबट्याची बोटं निमुळची असतात.

३. वाघाची पंजा किंचित पसरट असतो तर बिबट्याच्यां पंजा साचेबद्ध (कॉम्पॅक्ट) असतो.

४. ४ ते ६ महिन्याच्या वाघाच्या पिल्लाचा पंजाचा आकार व पूर्णवाढ झालेल्या बिबट्याचा पंजा सारखा असतो.

५. वाघाचे पिल्लू साधारण १८ से २४ महिने आई सोबत रहाते.

वाघाचा पंजा चौरस असतो तर वाघीणीचा पंजा आयातकार असतो. वाघाच्या पंज्याची बोट गोलाकार तर वाघीणीची बोटं निमुळती, टोकदार उमटतात.


वाघाच्या अप्रत्यक्ष खुणा



नर वाघाचा पंजा




मादीचा पंजा



पिल्लाचा पंजा



नर वाघाच्या पंजाचे रेखाचित्र – ६ इंच (साधारण चौरस)



मादीच्या पंजाचे रेखाचित्र – ५ इंच (साधारण आयताकार)



पिल्लाच्या पंजाचे रेखाचित्र – ३-४ इंच



वाघाची ताजी विष्ठा



वाघाची दोन दिवसाची विष्ठा



वाघाची जुनी विष्ठा








वाघाच्या मागील पायाच्या खुणा. **(Scrape Mark)** या खुणांमध्ये मलमुत्र असु शकते.





वाघाने झाडावर घासलेली नखे **(Rake Mark)**



शिकार खातांना वाघ

बिबटच्या अप्रत्यक्ष खुणा



बिबट्याच्या पंजाचे रेखाचित्र – ३-४ इंच



बिबट्याने केलेली शिकार



बिबट्याची विष्ठा



PIP पाऊलखुणा पटल बाबत मुलभूत माहिती

१. PIP **कधी बनवावेत ?**

- पावसाळ्यात सर्व PIP धुवून जातात. त्यामुळे पाऊस पूर्ण थांबल्यानंतर लगेचच PIP बनविण्यास सुरूवात करावी. साधारणपणे ऑक्टोंबर महिन्यापासून PIP बनवण्यास सुरूवात करावी व सदर PIP बनविण्याची वेळ वेगवेगळ्या भागात वेगवेगळी असू शकते. पाऊस थांबल्यानंतरच PIP बनविण्यास सुरूवात करावी.
- पावसाळ्यात चिखलात उमटलेल्या पाऊलखुणांच्या नोंदी आपण गस्ती नोंदवहीत घ्याव्यात.
- कधीकधी मध्येच अवकाळी पाऊस येतो. त्यामुळे PIP धुवून जातात किंवा पावसामुळे माती घट्ट होते. पाऊस गेल्यावर ते लगेच पुन्हा बनवावेत.

२. PIP **कोठे बनवावेत ?**

- जंगलातील रस्ते, पायवाटा, सुकलेले नाले, पाणवठयांचे काठ, पाणवठयावर जाणाऱ्या प्राण्यांच्या वाटा (सगरी) इत्यादी ठिकाणी PIP बनवावेत.
- प्रत्येक वाटेवर प्रत्येकी १ ते १.५ किमी अंतरावर PIP बनवावेत.
- तीन रस्ते /पायवाटा एकत्रित येत असतील तर एकत्रित येणाऱ्या तिन्ही रस्त्यावर PIP बनवावेत.

३. PIP **कसे बनवावेत ?**

- PIP बारीक चाळणीने माती चाळून साधारणतः अर्धा सेमी. चा बारीक थर रस्ता/पायवाटेवर पसरावा.
- PIP ची लांबी किमान ४-६ मीटर तर रुंदी रस्ता किंवा पायवाटेच्या रूंदी एवढी असावी.
- PIP कृत्रिम पाणवठया भोवतीसुध्दा १ ते २ मीटर रुंदीच्या पट्टयात बनवावेत.
- गस्ती रस्ते, पायवाटा इत्यादीवर जास्तीत जास्त ठिकाणी PIP अथवा प्राण्यांचे ठसे उमटतील याप्रमाणे माती टाकल्यास आपणास प्राण्यांच्या अप्रत्यक्ष खुणांवरुन, आपल्या नियतक्षेत्रातील वन्यप्राण्यांचे अस्तीत्व व वावर कळेल.

४. PIP **वरील नोंदी कशा घ्याव्यात ?**

- पायदळ गस्ती दरम्यान वाटेत येणाऱ्या PIP वर उमटलेल्या विविध वन्यप्राण्यांचे ठसे ओळखून त्यांची लांबी रूंदीसहीत नोंद घ्यावी. तसेच माणूस, पाळीवकुत्री व पाळीव गुरांच्याही नोंदी घ्याव्यात.
- तसेच पेन, पट्टी ठेवून ठशांचा मोबाईल/ कॅमेराने फोटो घ्यावा.




- प्रत्येक PIP वरील किमान आठवडयातून एखदा तरी नोंदी घ्याव्यात व त्या PIP नोंदवहीत नोंदवाव्यात, किंवा ज्या ज्या वेळी त्या PIP जवळून गस्ती करण्यास जातो, त्या त्या प्रत्येकवेळी PIP वरील नोंदी घ्याव्यात.


५. PIP चे व्यवस्थापन कसे करावे ?

- प्रत्येक PIP ला तुमच्या नियतक्षेत्राचा एक कोड दयावा व त्याचे GPS तुमच्या Beat Book मध्ये ठेवावे. उदा. STR/CNP/Zolambi/1, STR/CNP/Zolambi/2.इ.
- PIP च्या कोडची पाटी (बोर्ड) PIP जवळच लावावी. सदर पाटी ही लाकडी किंवा सिमेंट पिलर लावून त्यावर PIP कोड नंबर लिहावा.
- मधून मधून येणाऱ्या अवकाळी पावसात PIP खराब झाल्यास लगेच पुन्हा बनवावेत.
- PIP ला प्रत्येक भेटी दरम्यान नोंदी घेतल्यानंतर झाडाच्या फांदीने PIP वर उमटलेल्या जुन्या खुणा/ठसे पुसून टाकावेत. PIP वर काडीकचरा पडला असेल तर तो स्वच्छ करावा.
- PIP वर वाहन घालू नये. वाहन बाजूने घ्यावे किंवा वाहन घालण्यापूर्वी PIP वरील निरिक्षणे नोंदवावीत. तसेच, वाहन गेल्यावर चाकांचे ठसे फांदीने पूसून टाकावेत.
- PIP वर कोणत्याही प्राण्यांचा ठसा स्पष्ट उमटेल, अशा पद्धतीने अधून मधून मातीची भर घालावी.

वाघाच्या ठश्याद्वारे मिळणारी माहिती




वाघाच्या मागील व पुढील पायाच्या ठशातील फरक




(नर वाघ चौकोनी) (मादी वाघ आयत)

वाघाच्या नर व मादी च्या मागील पायाच्या ठशातील फरक



LF = डावा पुढचा (Left Front)
LH = डावा मागील (Left Hind)
RH = उजवा मागील (Right Hind)
RF = उजवा पुढचा (Right Front)
STEP = पाऊल
STRIDE = ढेंग
STRADDLE = शरिराची जाडी








PIP वरील वाघाच्या ठश्याद्वारे मिळणारी माहिती




वाघाचा डावा व उजवा ठसा ओळखणे



















" वने आणि त्यातले वाघ यांचा विनाश करू नये
आणि वाघांना वनांतून नष्ट करू नये " कारण
" वनांशिवाय वाघ नाहिसे होतात आणि
वाघांशिवाय वने नाहिशी होतात "

- महाभारत

SAHYADRI TIGER RESERVE

कार्यकारी संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान यांचे कार्यालय

दुसरा मजला, वनवर्धन ईमारत, मुख्य पोस्ट ऑफिस समोर,
ताराबाई पार्क, कोल्हापूर, ४१६००३ फोन नं. ०२३१ - २५४२७६६
email- ccfwlkolhapur@mahaforest.gov.in